# अर्पण

कधी कधी या क्षणिक जीवनातली
शल्यं हृदयात खोलवर रुततात,
कधी हळवे शब्द गलबलून टाकतात
कधी अननभूत जाणीवेची तार
नकळत छेडली जाते.
अशा अनेक क्षणांना शब्दांकित
केलेली ही अंजली त्या निर्मात्याला अर्पण!
ज्यानं हा ब्रह्मांडाचा
पसारा मांडलाय!

**- शुभदा**

- **मनातल्या कविता**
**© डॉ. शुभदा शिराळकर**
**(डॉ. सौ. शुभदा दिनेश नैन)**
‘श्रीपदा’, टिळकनगर
औरंगाबाद
फोन : (०२४०)२३२९९७८
- **प्रकाशन क्र. :** ३८५
- **प्रकाशक :**
  **रजत प्रकाशन**
  १४, जयविश्वभारती कॉलनी
  चेतक घोडा चौक, औरंगाबाद.
  मो. ९८५०१४००२५
- **पुणे कार्यालय :**
  द्वारा-वैभवी एन्टरप्रायजेस,
  ६६६, नारायण पेठ,
  अप्पा बळवंत चौक, पुणे-३०
- **अक्षरजुळणी :**
  सौ. अर्चना नलावडे, औरंगाबाद
- **मुद्रक :**
  ओंकार ऑफसेट, औरंगाबाद.
- **मुखपृष्ठ :**
  अनिल जोशी, औरंगाबाद.
- **प्रथमावृत्ती :** १ फेब्रूवारी २०१३
- **मूल्य : २०० रूपये.**

## शुभेच्छा

बाल्यावस्थेपासूनच कल्पनेच्या राज्यात रमणारी व्यक्ति जे जे मनांत येईल ते ते कागदावर उतरविण्यात मशगुल असते. त्यावेळी काळाचे भान नसते. हळूहळू बालपण संपून यौवनाकडे वाटचाल झाली की मनांतील विचारांचे स्वरूप ढवळू लागते व अनेक विचार कागदावर उतरू लागतात. अशा रितीने लिहिलेल्या कवितांचा विकास होतो व काव्य निर्माण होते. अशाच कविता सौ. शुभदा नैनच्या विचारांतून निर्माण झाल्या. दोन वह्या भरल्या तरी त्याच्याकडे लक्षच नव्हते... अशा ह्या नाना तऱ्हेंच्या कविता वाचतांना वाचकांना खूप आनंद मिळेल. अभ्यासात हुशार, वादविवाद, ज्योतिषशास्त्र आणि शास्त्रीय संगीतात तीन वेळा डॉक्टरेट मिळविलेल्या सौ. शुभदा नैनच्या कविता नक्कीच सर्वांना आवडतील.

**-सौ. प्रतिभा शिराळकर**

## मनोगत

प्रत्येक व्यक्ती ही ईश्वराची या जगातली एकमेव कलाकृती असते. शरीर, बुद्धि, मन आणि आत्मा अशा विविध रंगांनी नटलेल्या मानवाला भावजीवनाचे वेगवेगळे पदर आयुष्यात अनुभवायला मिळतात. रोजच्या आयुष्यात वेगवेगळ्या गोष्टींना तोंड देता देता अंतरातल्या या तारा कधीकधी झणकारतात. पण या अंतर्मनाच्या नादाकडे लक्ष देण्यास वेळ मात्र नसतो.

हीच अंतर्नादाची दृश्य आवृत्ती म्हणजे कलाविष्कार होय. प्रत्येक वेळी ही अनुभूती स्वत:चीच असेल असे नाही. दुसऱ्या व्यक्तिच्या वेदना, आनंद इत्यादी भावाविष्कारांनीही संवेदनशील कलावंताच्या कलेच्या आविष्काराचा प्रादुर्भाव होऊ शकतो. कला हे भावनांचे उत्सर्जनच आहे. (emotional catharsis is art)

माझ्या बाबतीत बोलायचे झाले तर अत्यंत संवेदनाशील मन असल्यामुळे जे जे समाजात घडते त्याचा झणत्कार मनात होतो. मेडिकलचा अभ्यास करतांना, डॉक्टर म्हणून समाजात वावरतांना माझ्या मनातील ही कलावती सतत जागृत राहिली. स्वत:ला गायनातून, कवितांमधून व्यक्त करत राहिली. ह्या कविता अनेक वर्षे पडून राहिल्या. त्यांना आज प्रसिद्ध करतांना एक अत्यंत अनोखा संकोच वाटतो आहे. आनंदही होतो आहे. माझी आई डॉ.सौ.प्रतिभा शिराळकर हिच्या आग्रहामुळेच हा संग्रह प्रकाशित होत आहे.

मी एक डॉक्टर! मी एक गायिका! मी एक कवयित्री!

अशा अनेक रूपांमध्ये मनाच्या किनाऱ्यावर आदळणाऱ्या घटनालहरींनी जी भावनिक प्रतिक्रियात्मक कलोत्सर्जन झाले त्याच ह्या कविता होत!

जसजसे आयुष्य पुढेपुढे सरकते तसतसे हे मनाचे किनारेही आपली रचना बदलतात. त्यामुळेच वेगवेगळ्या वेळी झालेला कलाविष्कार हा वेगवेगळ्या पातळीचा असतो.

**-डॉ. सौ. शुभदा दिनेश नैन**

# मनातल्या कविता

डॉ. शुभदा शिराळकर
(डॉ. सौ. शुभदा दिनेश नैन)

रजत प्रकाशन, औरंगाबाद

## १. याद

तू आठवतेयस!
झुळझुळत्या वाऱ्यांनो, किलबिलत्या
पक्ष्यांनो! तुम्हालाही आजच का स्फुरले
गीत माझ्या अंतरीचे?
थरथरत्या उरात
याद तुझीच साठवलीय!
खळाळत्या निर्झरातून
तूच हसते आहेस
कधी होतीस तेव्हा
अशाच तुझ्या हास्यातून
आठवली होती मला चांदणी रात्र!
पण आज...
दिवे सारे मालवले आहेत!
काळोखाच्या लाटांवर
तुडूंबणाऱ्या काजळीला

आज कुणी पुसतच नाहीये!
चैतन्याच्या पालवीला अभ्र आलीत
खिन्नतेची!
अशीच कधीतरी ढाळलीस तू आसवं!
कमलदेठांनी टिपले होते तू ते अश्रू!
पण आज मला सावरणारे तुझे हात
कुठे आहेत?
मिटणाऱ्या कळीला फुलवणारा गंध कुठाय?
तो हरवलाय!
पुन्हा न गवसण्यासाठी ।
तरी मी ठेवलाय उरात जपून
तो पुन्हा दरवळण्यासाठी ।

## २. आठवण

गर्द काळ्या ढगात
तळपते आहे वीज!
मनातही माझ्या रेखलीय तुझी बीज!
कृष्णघनांनी आच्छादलेल्या
सावळ्या घनश्यामल मेहरपीला
आज फुटलीय नवीन झळाळी!
आतुरलेल्या डोळ्यातून
खुणावतेय माझीच सावली!
सरत्या दुपारी कातरला सांजेला
मीच झालेय खुळी!
रिमझिमताहेत धारा
बरसताहेत गारा
चिंब भिजत्या मनात
पालवतेय आशा!
पळापळाला, क्षणाक्षणाला जाणवतेय
नादमयी प्रवाही तन्मयता
छेदस्वरांनी विणलेल्या गीतात
आहे तुझीच कमतरता!
शिल्पाला कुरवाळतांना,
शब्द माझे, मी त्यांची असते!
तर आज बरसणाऱ्या आकाशाला नेत्रात
पाठवतांना मी तुझी आठवण करते आहे!

## ३. खूण

कॅशियाच्या, पानापानांवर
तरारते कोवळीक!
झुंजूमुंजू होतांना घसरते दंव!
चकाकणाऱ्या थेंबातून हसते प्रकाशकणी!
चैतन्याच्या चाहूलीची गुणगुणते गोड गाणी!
पण डोकावतां ऊन बावरे
कणी विरून जाईल!
अन् उरेल फक्त मागच्या
वासंतिक स्मृतींची खूण!

## ४. क्षणभूल

कशा धपापताहेत दिशा!
रात्र सुस्तावली आहे!
वाहता ओघ पेंगुळलाय!
अंध:काराच्या शोधात मी एकटीच
फिरू कशी या रानात?
जिथे शांतता मेलीय
क्षणांचे टाके तर मीच उसवतेय!
खरंच शून्यपणे फिरू कशाला?
पाटी कोरीच होती!
तरी अक्षरं ओघळली!
गिरक्या घेतच ऊसळली!
आणि या चाळणीतून
प्रसंगकण कसे गळून गेले?
मी तर चालतच राहीले!

पण वाट ही कुणी दाखवली नाही!
आता शिणलेय!
कारंज्याचे तुषारही भारी वाटतात!
आठवणींची शालही नको वाटते!
आरशात प्रतिबिंब डहुळले नी खळकन
आरसाच फुटला!
मी फूल स्पर्शले ती पाकळ्याच
गळून गेल्या!
स्वप्नात तरी येवढी असीम नीरवता कशाला हवी?
भाबडेपणाची येवढी जाण कशाला हवी?
मीच तर हरवलेय!
या खळबळणाऱ्या लाटात,
मी प्रतिमा शोधीन!
या शेवाळी डोहात प्रतिमा थरथरताहेत!
शब्दकवच, भावनांची कवचकुंडलं इथंच,
उतरवायची आहेत!
यातलात कोरडा ओलावा भरलाय!
थरथरून स्पर्शाची जाणीव हुंगतांना
मला 'मी' हवीय!

एकांताच्या तळात मला जाऊ दे!
डोहाची साद ऐकू येते कां तुला?
गात्रांची स्पंदन त्या हाकेसाठी आसुसली आहे!
हृदयाचा ठोका चुकतोय!
तो हिरवट काळीमा, ती थंडाई!
ती नीरव शांतता!
तो काळजाला झोंबणारा गारठा!
माझीच वाट पहातोय!
त्या संथतेची मूक साद मलाच आहे!
या निरर्थक क्षण पाकळ्यातून ओघळणारे थेंब न
पुसताच मला गेलं पाहिजे!
वेढा घालणाऱ्या गारठ्यात विरघळायला
मला गेलं पाहिजे ! मला गेलं पाहिजे !

## ५. बोल

द्राव्य बनून सुरात तुझ्या
शब्द माझे विरघळले!
कणाकणांनी फुलता फुलता
गीत माझे रिमझिमले!
छायेच्या परिसरात फिरतांना
शब्दच मला विसरले!
अर्थांच्या प्रवाहात वहातांना
माझी मीच हरवले!
गवसलेल्या क्षणांची वीण गुंफते आहे!
हरवलेल्या क्षणांना उसवून टाकतांना,
तुझ्याच शब्दात मी
विरघळते आहे!
प्रकाशाच्या शालीत गुरफटून
हसणारे तुझे बोल,
माझ्या मनात रेंगाळत आहेत!
माझ्या स्वप्नात हरवले आहेत!

## ६. मित्र

पूर्ण चंद्र फुललेला असतो!
चांदण्याशी शिवाशिवी खेळतो!
लिंबोणीच्या झाडाआड दडतो!
मुक्त कूंजनात गुंगतो!
पण तोही ग्रासला जातो,
राहूच्या छायेच्या स्पर्शाने!
विरता चंद्र खळ्यात बुडतो!
स्वच्छंद फिरणाऱ्या बागडणाऱ्या हरिणीला,
ध्यानीमनी नसतांना शिकाऱ्याची गोळी टिपते!
इवलंसं हृदय फडफडतं,
आणि आक्रंदत शांत होतं!
जगाची ही रहाटीच आहे!
खेळतं फुल कोमेजून जातं!
जीवनपुष्प ही असच
कोमेजतं!
पूर्ण कुसुमितत्व तर
फार दूर आहे!
आता समोर दिसतेय दरी!
लहानपणापासूनच मी स्पर्शत आले त्याला!
जागाला दाहक वाटणाऱ्या,
या सवित्याची शीतल बाजू फक्त मीच पाहिलीय!
उशीवरून ही सावरीचा मऊपणा अंगाला बिलगतो!
त्याचेही नरम धागे तर मीच चुंबलेत!
मीच त्याची सखीय!

हरवत्या दुपारीत, एकटं एकटं
वाटतांना तोच माझ्या
सोबतीला येतो आणि-
डोहाच्या शीतलतेचा आभास
देऊन जातो!
त्याचं मूक आमंत्रण मी
टाळलं, अव्हेरलं!
आजपर्यंत मीही त्याला
नकारार्थी खुणवलं!
पण आज चौकट फुटतेय
मीही उरी फुटतेय!
आजवर तरी कसंही आयुष्य
ढकललं!
सर्वांच्या कौतुकात स्वत:ला
विसरून टाकलं!
पण हा फुगा आज फुटतोय
शेवटी नातेवाईक तरी
काय कच्च्या रेशमाचे दुवे आहेत!
माझ्या मित्रा आज मला
सत्य आकळलंय!
पण दुर्दैव असं की
तुझी मैत्रीण असूनही
तुझ्याप्रमाणे सत्याचं हे
दाहक विष मी पचवू शकत नाहीय!

आता तुझी फार गरज आहे
आजवर तू मला बोलावलंस,
प्रेमाने गोंजावरण्यासाठी बोलावलंस,
मी खुळी -
या कमळाच्या वेलीत गुंतत राहिले!
पण आज गुंता सुटलाय!
आज मीच तुला हाकारतेय
तू ये!
मला आपल्या पंखाखाली घे!
तुझ्या गार स्पर्शात
माझी न मी राहू दे!
या जगाला विसरू दे!
आता मला अधिक उशीर साहवत
नाही रे!
डोळे तुझी वाट पाहून थकलेत!
तेल ही संपत आलंय!
ये रे लवकर ये लवकर ये.
माझ्या सच्च्या मित्रा
तू तरी वचनाला जाग!
आणि तुझ्या मैत्रीत गुंगून
मला या खोटी मूल्यं जपत
जगणाऱ्या जगाचा
विसर पडू दे!
आता किती बोलावू
मृत्यो ये लवकर ये!

## ७. अस्तित्व

पंखांच्या रेशमी मखमलीत
अंग अंग मोहरले!
सनईच्या मधुर गुंजनी
तनमनधन हरपले!
मी अशीच एकलीच स्वत:ला
हरवून बसले!
सूर, नाद, लय, ब्रह्म
कवळले त्वां त्रिगुण!
यदृष्टेच्छा मीच तरी
कमळाचे अश्रु धरावे!
कधी वाटले की
या उभारीत स्वत:ला झोकून द्यावे!
पण चालतांना पायच अडखळले!
आणि मिटून गेले एक अस्तित्व!
काल चाहुली स्फुरता स्फुरता!

## ८. सल

मी दूर हरवले!
हिरव्या धुंद परागात!
पिवळ्या काटेरी झुडूपात!
सलला जिव्हारी काटा!
लाल ढगांच्या किनारीला
विखुरले श्वेत बगळे!
विखरत विखरत पसरले
ऊन रेशमी सावळे!
जाईचा सुकुमार हात
देत गंध फुलता हसले!
सलताच काटा सोनेरी
वेदना कळवळली!
परिसुखाच्या सीमेला
दुःख बोचले!
मन वेदना जाणून उरी
व्यथा मलाच कळते!

गंधित वेड्या गुलाबा
मीच तुला भुलले!
रंग रूप गंध स्पर्शून विसरतांना
तुझे कांटेच विसरले!
अजाणत्या अस्फुट
सुखद फुलल्या या ओल्या, दुपारी
तू कधीच कोमेजलास रे!
पण सल मनात अजून सलतोय
मन हुरहुरतंय रे !
फक्त तुझ्यासाठीच !

## ९. आनंदघन

उभट त्रिकोणी जाळ्यात
शब्द माझे अडकलेले!
पिंगट प्रफुल्ल नेत्रातच तर
रंग सारे उधळलेले!
तळपत्या स्वर्गिय दुपारी
पायच अडखळलेले!
मी उभी अन मन मात्र माझे
दूर, उंच लहरत गेले!
ओलाव्याच्या चिंब स्पर्शात
सूर सारे डळमळलेले!
तरंगस्पर्श शोधतांना
मन हलके पीस झाले!

रिक्तस्पर्शा मुग्ध वसना
रातराणी दरवळते!
गंधदेणं लपवून
पुन:पुना दरवळते
कारंजे उंच फवारले!
रेषारेषातून या लाटा
धावत वाहत तरंगत आल्या!
घेऊन गंध फुलता झुलता
लगबगीने निघूनही गेल्या!
वर्तुळाच्या दोन कड्यांना
छेद देऊन समुद्र सरला!
अव्यक्त हसू घुमत राहिले
आनंदघन बरसत राहिले!

## १०. वाट पहातांना...

किती किती वाट पहावी!
वाट पहातांना डोळे थकलेत!
इकडे तिकडे निरखून
प्रसन्नत्व सरलेय!
ठरवलं होत की वळायचं नाही,
डोळ्यांनाही कळू द्यायचं नाही,
पण सगळे पत्ते ढासळले!
तुझ्याच मुळे ते ढासळले!
परिचित जागी नेत्र थबकले!
भिरभिरतांना पाय अडखळले!
चित्र रेखाटतांना दिवस सरला!
पण डोळे हसलेच नाहीत!
या पाठलागाला अंत नाही!
अर्थ नाही!
पण रिक्त आहे मन!
या पोकळीत कळत नाहीये,
की पाठलागाची जाण का मिणमिणतेय?
निरागस चेहरा अन खट्याळ डोळे
लुप्त झाले!
अन् क्षितिज हुरहुरत सुस्तावले!

## ११. कमळदल

दुपारच्या संथ कुशीत
जग निद्रीत विसावलेले!
खोलीच्या अशरण अंधारात
शब्द माझे मिसळलेले!
तप्त धारामृत वर्षाव व्हावा!
शब्द माझे घेऊनी उडावा!
दूर दूर मंद मंद,
भाव माझा आकळावा!
स्पर्शनिद्रा मोहतांना
मीच बर्फ होऊन जावे!
तप्त मुद्रांकित बंध माझे
तटतटा उखडून जावे!
आज माझी मी न उरते!
फक्त अर्थ शोधतांना

चार अश्रू ढाळून जाते!
स्मृतींच्या कबरींना!
हो! कारण
मृत संजीवनी आता फक्त
नेत्रात आहे!
शब्दार्थ सारे हटतांना,
बंदिस्त काळोखाला तिरीप
कशी पुरावी?
खिन्न रात्री सुन्न दुपारी
मीच माझे मन शोधावे!
तो स्पर्श हुंगता हुंगता,
मला कमलदल स्पर्शून जावे!

## १२. मंद्र

मंद्राच्या या खर्ज सुरांवर
मालिन्याची साथ दाटते!
वेल स्फुरता कारूण्याची
माझी न मी अशरीरिणी!
भावांनी रंग स्पर्शले!
शब्दार्थांनी हृदय फुलवले!
हे डोळे
झुकवत झुकवत अधरी खिळले!
डोहात निळाई खळबळली!
अन् वितळतांना उन पसरले!
स्पर्श, शब्द अन् भावफुलांची!
रिती माझी ओंजळ आहे!
कधीतरी परिसावी जाण
अस्फुट मनाची!
स्पर्शबंधाने बांधलेल्या
बंधनास मुक्ता व्हावी!
केवडा वनात फुलला
धुंद गंधित मनी मोहरला!
पण रेखता शिशिर सावळा
स्मृतीगंध तो पार हरवला!
रंग खेळले रंगसख्या मी
हरवून शोधून थकले आता!
आता आहे जाणीव केवळ
तृप्त माझ्या तृषार्ततेची!

▯ ▯ ▯

## १३. पारिजात

विरून खिन्न सांज,
रात्र चढते आहे!
वितळवत अंधार लक्ष्य,
सुधाकर (चंद्र) ही चढतो आहे!
सळसळत्या पलाशाची
हिरवी निमुळती पानं!
अन् फुलून फुलून पेटणारी
अंगारपुष्पही स्तब्ध आहेत!
दूर कुठेतरी,
नवजाताचा टाहो,
अन जाळ तोडतांना
हसते विद्ध मुग्धा!
ओलं चांदणं सांडतंय!
अन् हा अमृतकुंभ लवंडून,
लाटा फेसाळत्या धावत येतात!
रातराणी फुलतेय!
या सुवासाचं बेभानत्व!
नेणिवेत बुडवणारं सुखद माधुर्य!
ही धुंदी नशीली आहे!
या कळ्या उमलताहेत!
चंद्र हसतो आहे!
झुलताहेत डहाळ्या!

पण -
बागेच्या एका उदास कोपऱ्यात,
निर्मल पारिजातक सुकत चाललाय!
कोवळी तनू झाकळतेय!
एक जीवन तरारतं,
कणाकणाला मालवलंय!
मिटायचं पण हसता हसता!
मिटतांनाही गंध,
उधळत जायच!
घायाळ जटायूला
असंच वाटलं असेल कां?
तेव्हा त्यानं शेवटचा श्वास सोडला?
हा नाजुक प्राजक्त क्षणाक्षणाला,
कोमेजतोय!
त्याचं जीवन झुकतंय मृत्यूच्या धुक्यात!
पण भार देऊन चालतंय माझ्या स्कंधावर!

## १४. साफल्य

कधीतरी एक श्रावण येईल!
मंदीची नक्षी खुलत जाईल!
स्थिरावणाऱ्या तरंगावर,
रोमांच फुलतील!
पाकळ्या पाकळ्यातून
सुगंध हसेल!
विरघळल्या क्षणांत,
दरवळल्या गंधांत,
मी बुडून जाईन!
इतक्या दिवसांची
असीम प्रतीक्षा,
सफल होईल!
रिमझिमत्या सरीतून,
खळखळत्या झऱ्यातून,
झंकारत्या सतारीतून,
मी स्वत:ला शोधत राहीन!
विराणीची आर्तता,
हृदयीची व्याकुळता, विराम पावेल!
निळ्याशार ढगांची याचना,
हरवल्या क्षणांना घातलेली साद,
मला पुन्हा गवसेल!

खुदकन हसणारे,
हसता हसता लाजणारे,
लाजता लाजता हसणारे,
क्षणात रूसणारे,
एक फुलपाखरू,
कळीच्या उमलत्या गंधात,
हरवून जाईल!
गुरफटून जाईल!
अहंची जाणीव विसरून जाईल!

## १५. कोंदण

आज अचानक कातरवेळी
व्यथा निखळली शब्दांतून!
इंद्रधनूंचे रंग पिऊन,
साकळणारे अश्रू झरताहेत!
धूसर या सांजसावल्या
हालत डोलत भिरभिरतात!
आणि
थरारणाऱ्या या मानसाला
वेढून बसते गूढ उदासी!
तरंगत येतात मधु स्वरलहरी!
फुलत खुलत झुलत जातात!
बेचैन अभ्रे या मन:पटलावरची,
सरकत नाहीत!
शहारती ही स्तब्धता!
मन झाकळणारी ही गूढता!
मनस्पर्शी अबोल कालण्य
या शिल्पातून बोलके होते!
इथे घुमतो नाद हुंकारे!
भावनांना इथे कोंदण शिल्पाचे!
मात्र माझे मन तडफडते आहे!
कारण -
भावनांना डोकावायला,
शब्दांचे कोंदण सापडत नाही आहे!

## १६. धुंदी

मुक्त छंदाने
गळ्यात सूर माळत
गजरा गुंफला जातोय!
पावित्र्य प्रकाशले
दर्शनमात्रे पारिजाता!
धुंद निशिगंधी
मन बुडून गेले!
रंग अंग फुलवित्या केवड्याचा,
गंध धुंद हा दरवळला!
पानोपानी रमता अरूण सळसळला!
धुंद धुंदिता मन मोहत हा,
सोनचाफा अवतरला!
चाहुलीच्या स्पर्शे हळू लाजून
लाजवंतीला खुणवत हसला!

## १७. संवाद

शेवटी हसलासच ना?
मला कळते ते तुलाही कळले!
तारा जुळून षड्ज-मध्यम संवाद साधले!
जडले तेही कळले!
नि हरवले तेही गवसले!

## १८. कधी असं वाटलं होतं

स्तब्ध निथळत्या रात्री,
टपटपत्या चांदण्यात,
कधी मला नहावंसं वाटलं होतं!
ओल्या ओल्या श्रावणात,
बरसणाऱ्या सरीत,
कधीतरी मला वाहून जावसं वाटलं होतं!
धुकाळ सकाळी,
दवाच्या समुद्रावरून,
बर्फ होऊन,
कधी मला वितळावंसं वाटलं होतं!
धुंद लहरींसमवेत,
नशील्या रात्री,
स्वरांबरोबर लहरावंसं वाटलं होतं!
मदभऱ्या काळोखात,
तृप्तीच्या पेल्यात स्वत:ला,
बुडवून घ्यावंसं वाटलं होतं!
आणि,
फेसाळत्या आवर्तात,
भिरभिरतांना,
दिशाच सापडली नाही,
तेव्हा तुझ्याच आठवणीनं,
रडावंसं वाटलं होतं!

## १९. देणं

देऊन देऊन तरी
मी तुला काय देऊ?
न अमोल रूपसंपदा न कुशाग्र बुद्धिमत्ता!
कसा संपत्तीचा ओघ ओहळावा?
मी केवळ कफल्लक!
मजजवळ काही नाही!
देण्याला तुला
जे माझे तेच तुझे
देऊ काय वेगळे?
मात्र
प्रेम येवढे द्यावे तुजला
की नभाने ओशाळून झुकावे!

## २०. साथ

एकांताच्या खोल तळाशी
मूक होते माझी वाणी!
अबोध जाण एकलेपणाची
आक्रंदते मनाच्या तळाशी!
प्राजक्ताच्या धुंद गंधामधूनी
देते साद अबोल माझी!
रसरसती गंधित स्फूर्ती दरवळणारी!
कणाकणातून जागृत होते!
जी मजला फुलवून टाकिते!
मारून वास्तवतेतून भरारी,
दूर माझी स्फूर्ती मजला नेई!
कधी बोलते व्यथा मनाची,
कधी मूर्तते साद ब्रह्माची!
अजाण अस्फुट मुकुलिका फुलते!
कधी कधी मम मानसमंदिरी!
तरी वेढते अखेरच्या क्षणी
व्यथा नि जाण एकलेपणाची!
उरी हरवूनी जावे तेव्हा,
मनी फुलून यावे जेव्हा,
तेव्हा मिळत न साथ मनाची!

## २१. आस

व्याकुळलेल्या झंकारातून,
वेदनेच्या आर्त वीणेतून,
उमटते व्यथा माझी!
डोहातून खोल नेणीवेच्या,
साद देते मजला कोणी!
तरंग निर्भर मनावरूनी,
मालिन्याचे ओघ सरकती!
दूरवरूनी साद घालिते कुणीतरी!
चुंबकामाजी लोह आकर्षते!
अचपळ मन माझे धाव घेते!
दर्शनार्थ तव आक्रंदत,
घननीळा तव कृपेस्तव तळमळते!
जग संसार नि नैमित्तीक कृत्ये,
वाटती उसाच्या रसहीन चोयट्यापरी!
देवा घेशील कधी चरणाशी?

## २२. वलयं

शांत शांत धुक्याच्या कुशीत
एक दुपार थबकलेली!
तरंगणाऱ्या कणांवर मेघछाया दाटलेली!
टायर्सच्या पंक्चरची किर्र रात!
ॐकार सादाला वलयं फुलवत
उभी खुळी झाडी!
फुटणारे भांडे,
नि रसरसणाऱ्या निखाऱ्यांची दाट मंदता!
कानांना मंत्रवणारी हीच गूढ स्तब्धता!
इथेच फुलते आकाशपर्णाला,
आवाजाची पालवी!
याच तीरावर बुद्धाने रित्या केल्याहेत
देहगंधाच्या ओंजळी!
मालवत्या काजळीवर हिरवट साथ दाटतांना,
हीच हुरहुर नि हीच कातरता,
माझ्या हृदयात गोठते आहे!
हेच निस्तब्धपण मला खेचतंय!
लाटाच लाटा!

बेभान लाटात
हिंदोळणारी ही नाव!
भीती येवढीच वाटते की,
खचल्या उरात
येवढं रसरशीत कोवळेपण,
येवढी ओढ सामावयाची शक्ति उरलीय का?
डोळे उघडे तरी न्मीलीत!
केवळ दिशाच ऐकताहेत!
मी तर मिटते!
मिटता मिटता मात्र,
पापण्यांवर कातरता
काजळ रेखत जातेय!
ह्याच शांततेला शोषत,
फिनिक्स उडेल!
हीच स्तब्धता गिळतेय
माझ्या स्वप्नांची वलयं!

## २३. परदेस

एकदा मी खूप दूर हरवले!
दिवस मावळत होता रात्र खुणावत होती!
हिरव्या पिवळ्या ज्वाळांची टोकं
माझा पदर खेचत होती!
नुसत्या जाळीजाळीतून ऊन ठिबकत होतं!
चालताचालता मी पुन्हा पुन्हा बुडत गेले,
अंत नसलेल्या पोरक्या अंधारात!
चहुकडे माणसंच माणसं-!
लांबट चौकोनी गोल चेहऱ्यांची!
जिवण्यांची टोकं वळवलेली!
त्यांचे केस काळेशार होते!
पण केसांना असाह्यतेचा शाप होता!
मला घेरतांना त्यांनीच मला हसवलं!
दूर दूर घुंगूर गात होते!
हळूहळू फिरत फिरत चिमण्या ताल देत होत्या!
मला धावतांना पाहून जिवण्या पळून गेल्या!
माझं हास्य पाहून चिमण्या फ्रीजमध्ये दडल्या!
झाडंच मला बोलावत राहिली!
झाडांमध्ये नागमोडी सुस्तावलेपण विसावलं होतं!
विषारी नागांनी वेढून मला गिळून टाकलं!
ती काळसर हिरवट झाडं,

खाली मान घालून रांगोळ्या काढत होती!
रांगोळीचा रंग फिकट काळा होता!
त्या रंगावर पाकोळ्या नृत्य करत होत्या!
माझ्या चाहुलीने बिचकून ते चेहरे उधळले!
रस्ता कापतांना चिमण्या उगीचच मला हॅलो
म्हणाल्या!
गाणाऱ्या घुंगरांनी मला जेवू घातलं!
नकळत त्या भाषेनं मला दूर लोटलं!
हताश एकाकी विफलतेत
मी स्वत:ला वेटोळून घेतलं!
पावलांना लाल माती बिलगली होती!
माती मला म्हणाली, 'का रडतेस?
हा तर तुझाच मार्ग आहे?'
मी इकडेतिकडे पाहिलं!
तेव्हा धुकं मला वेढायला झेपावत होतं!
डोळे मिटतामिटता ओठ पुटपुटले.
'मी कणांतून विरघळून जाईन'!
आणि फक्त माझे शब्द रेंगाळतील,
जे या साळुंक्या पुसून टाकतील,
कारण हा मला परदेस आहे'!

## २४. विसर

विसर आता ती स्वप्नं!
नि फुललेले निखारे!
कारण,
तप्त लोहकणांनी,
माझं मनच जाळून टाकलंय!
जळून हाडं झिजलीत!
गंगा तरी चंदन देईल कां?
मऊ मऊ हळव्या या हाडांना?
आता नकोशी वाटते स्वप्नशय्या!
विझलेले निखारे तरी ,
किती वेळ धग पुरवतील!
पण मला थंडावा चालतो!
गारठा मला मानवतो!
मी तेच जपून ठेवीन!
पुन्हा पुन्हा आरशात पाहून,
ओलं दु:ख उगाळायला!
स्केटिंग केलंस तर-
तर डोळ्यात रजनीगंधेचं काजळ
मात्र घालू नकोस!
कारण ते तुला घसरवेल!
निघता निघता फक्त,
अंगावर शिंपड गुलाबपाणी!
जे तुला धुंद मैफलीत
सुगंध देऊन भानावर ठेवेल!

## २५. धग

बुडलास जेव्हा फेसाळत्या लाटांत
तेव्हा विचार केलास का?
की क्षितिजं फार दूर राहिलीयत?
बिभासचे सूर विरत गेलेत
पण-
प्रतिध्वनींचा कंप मात्र अजूनी रेंगाळतोय!
निळ्याकाळ्या लाटात खोल झिरपत ,
सोनेरी वर्खात न्हात,
अंधत्वाची जाणही विसरलास?
खडक स्थिर उभाय-!
त्या समतोलत्वाचं एक गहिरं कौतुक!
या बेहोषीची एक वेडी नशा!
उगवत्या पहाटेची स्नात बेचैनी!
फिनिक्स कायमचा मरू घातलाय!
कसं कळत नाहीयै तुला?
मी तर रोज आसवांनी न्हाते!
त्यांनी मला भुलवलं!
जगाला भुलवलं!
पण तुला भुलवतांना आज,
वेलांट्या वळसे झाल्यात!
खरंच विरघळतोयसं?
नको-

साखर होऊ नकोस!
तुझ्यासारख्या रेखीव शिल्पानं,
संगमरवरच रहायला हवंय!
साखर नाही!
जाता जाता सुचवतेय!
जर कधी या काचांवर
घोंगावत वादळ आलं, तर ते
निळी निळी काचेरी स्वप्नंच थोपवतात ना?
पण स्वप्नांनीच तर तुला धोका
दिला नाही ना?
निळी स्वप्नं जर तुला त्या लाटांतून
गुलाबी ज्वाळा फेकतांना दिसली
असतील तर मात्र,
अबोल पारिजातही
थरथरेल,
मात्र फक्त एकदाच!

## २६. सागर

आता कशाला तू मागतोयस
ती कोमेजलेली रक्षाफुलं?
का हाही माझा भासच आहे?
रक्षामहालाचा अट्टाहास करणार
नाहीसच म्हणा!
कधीतरी एक वाळूचा किल्ला
फुलत होता!
गुंजनात बहरत होता!
पण पावसानं त्याला बहरुच दिलं नाही!
ज्या क्षणी वाऱ्यानं शीळ घातली,
त्याच क्षणी वाळूची फुलं विस्कटली!
उरात खोलवर जखम घेऊन,
समुद्र वेडावून हसतच राहिला!
आता-
आता उरलंय काय?
शिशिरानं पान पळवलीयत!
स्वप्नसुद्धा खडकांनीच रंगवावीत!
प्रेमसुद्धा कांचेनंच करावं!
मऊ स्पंजची मात्र सालटी निघतात!
घायाळ जखमांवर फुंकरही नको!
सागरालाच हे कळतं!
ज्यानं कधीतरी अपार प्रेम केलं होतं!

## २७. शब्द

कधीतरी जेव्हा गात्रागात्रातून फुलून यावं
मनानं ध्रुवाचं लेणं ल्यावं,
आणि मेधा बहरून यावी,
तेव्हाच ओंजळ रिती का व्हावी?
उमलत्या सीमेला अपूर्णत्वाचा बांध का पडतो?
मन दाटून येतं तेव्हा,
कानच डोळे होतात!
चाहुलींचे स्पर्श होतात!
रंगरंग अंगोपांगी रेंगाळू लागतात!
पण मोती निसटतात!
कमलपर्णावरून थेंब घरंगळतात!
ही वांझ तडफडही गारवा देते!
भरलेले मेघ कशावर वर्षणार?
गैरसमज निस्तरायला,
भावभरले डोळेही मिटून घ्यावे लागतात!
हे कोवळेपण ही नव्हाळी हा आवेग,
कोणत्या कळांनी जाणावा हेच
कळत नाही!
ओठात एक तर डोळे दुसरंच बोलतात!
हे फसवं खेळणं मग असह्य होतं!
आणि मन कळवळून म्हणतं,
''सामोरे या शब्दांनो
मागुते येऊ नका''!

## २८. मृग

बेभान बरसणाऱ्या मृगाला,
कवेत घेत वाऱ्याचं नर्तन!
अन् झाडाझाडावर दडलेले
मृगपक्षी थरथरतात!
की कवाडं उघडून
किलकिलवत डोकावताहेत,
स्वप्नं मनानं गुंफलेली?
मिटतांना
संवाद किणकिणत झंकारला!
दूर वृक्षावर,
अग्निपक्षाचे,
लाल निखारे!
गुजाळ डोळे!
भिववणारे - थरकापवणारे!
तुषार झेलत वेडे,
उभे लयबद्ध डोलत रान!
आणि मूक नि:स्तबधतेनं
मिटून घेत पाकळ्या
मन वेडं रडतंय!

## २९. पुन्हा

पुन्हा कधी येईल कां
ही बरसती रात्र?
पुन्हा कधी मी होईन का?
थरथरती ज्योत?
हे सौंदर्य जीवघेणं आहे!
हे लालित्य मंत्रवेडं आहे!
वनश्रीच्या झाडोऱ्यात
पऱ्यांनी स्वप्नं पाहिलीत!
या पानापानावर
अप्सरांचे ओष्ठबिंदू ठिबकले आहेत!
मातीतही,
लालवट नाजुक तळव्यांची
नक्षी उमटलीय!
इथल्या हवेलाही रेशमाचा गंध आहे!
ज्यानं मला इथं खेचून आणलंय!
याच जिवंत रम्यतेनं
अनंताकडून हाकारलं!
उरी फुटून हसणारे,
जीव इथेच फुलतात!
वेड लावणारी ही राई!
जिथे कवड्या वेचल्या तिथे,
लाललाल गुंजा वेचतांना,
विखार कधी बोचलाच नाही!

कुशीत घेणाऱ्या,
देवतेला द्यायला,
पंखही उरले नाहीत!
असं वेड लावू नकोस!
असा जीव जडवू नकोस!
हात फार नाजूक आहेत!
जास्त ओढ लावशील तर -
तर मी भंगून जाईन!
मग तुकडे सांधायलासुद्धा
विश्वकर्म्याला येता येणार नाही!
हेच देणं देत
ओंजळ भरून दे!
मात्र ओततांना स्वप्नं
एकही अश्रू ढाळू नकोस!
जे माझ्या घायाळ हृदयाला
चिरत जातील!
सल बोचत राहील!
अन् मंत्रमुग्धता तशीच विरत जाईल!

## ३०. भूमी

चिरविरही मेघाची ही भूमी आहे!
नृत्यमग्न श्रुतीकीर्तीचे अश्रुबिंदू,
टपटपत ओघळताहेत!
ते मरण जगावं तसे,
शिंपले भुरभुरताहेत!
वेडी कालवं उगीचच वळवळताहेत!

## ३१. थेंब

झुकल्या संध्येच्या ओठांना,
कारुण्याची ओली वाळू!
अन् ढगात दडलेल्या ओलसर,
तारुण्याची संथ निद्रा!
निळ्या निळ्या नवलाईने,
आनंदडोह भरलेले!
रिते घन सांद्रावण्यासाठी,
थेंबथेंब फुलता आहे!

## ३२. नातं

डार्लिंग -!
आज अशा कातरवेळेला,
मला एकटी सोडून गेलास?
जातांना एकदाही वळून
पाहिलं नाहीस?
किती किती बंध गुंफलेत!
शब्द माझे गुंतलेत रे!
क्षण क्षण मी भोगलेत!
मनानं तर केव्हाच बुडी मारलीय!
असं इतकं मधाळ बोलता येतं?
जीवघेण्या नजरेनं,
इतकं घायाळ करता येतं?
शब्द शब्द निवडतांना,
पदोपदी अडखळायला होतंय!
पण शब्दच केवळ आधार नाहीत!
अंगांगातून पलाश फुलेल!
जे बोलता येणार नाही शब्दांनी,
ते आपले डोळे बोलतील!
तुझं माझं नातं आगळं
जगावेगळं आहे!
जीवच जिथे जडलाय तिथे
मी व्यर्थ शब्द कशाला उधळू?
तुला कळतं ना पण?
की मी तुझीच आहे?
अशी ओढ असं वेड
जिवाला धुंद करतं!

पण तुला केवडा आवडतो
की पारिजात?
मी जेव्हा माझ्याशी झगडते,
तेव्हा कदाचित हलाहल ओतेल!
पण तुझ्यासाठी मात्र
निवडुंगाचेही मदनबाण होतील!
तुझं माझं गुपित जपलंय मी!
पण भीती वाटते रे
की
अव्यक्ताचं व्यक्त कधी
होणारच नाही!
जर -
तुझे पातळ ओठ तू असे
घट्ट मिटून घेतलेस तर!
आपली रीतच न्यारी!
सुतात आपण भरलेत,
रेशमाचे हलके रंग!
पण हे तरी रंग पक्के आहेत ना?
का हाही केवळ वादळवारा आहे?
आज तू नाहीस!
पण शब्द रेंगाळताहेत!
तुझाच गंध उधळत!
पण खरं खरं सांग
तुला माझी आठवण येते का रे?

## ३३. प्राणमोगरा

मधाचे घट भरभरून
चंद्र उधळतोय!
तृषार्त मी मात्र
अजूनही फिरतेय एकटीच!
मी कधीच काही मागितलं नाही!
आजसुद्धा मी ओठ घट्ट मिटून घेतलेत!
पण मोगऱ्याचा तो गजरा,
मी अजूनही जपून ठेवलाय!
जेव्हा कधी तो हुंगते,
तेव्हा तरारून मोरपीसं डुलतात!
स्वप्नं कधी खरी होतात कां?
धुकाळ सकाळी फिरतांना,
दवबिंदू ओठांनी टिपत,
मीच वचन दिलं होतं!
पण कोसळत्या चंद्रानं
चांदणंही ओहोटीबरोबर ओढून नेलं!
भाससृष्टीचं वरदान मला आहे

प्रतिमांना ठेचकाळत,
प्रतिबिंबाचे अर्थ मी शोधते!
तुझीच प्रतिमा अजूनही,
येवढ्या दिवसानंतरही,
तेवढीच अस्पष्ट!
तेवढीच जीवघेणी लाडिक आहे!
दूरत्वातच तुझ्या झंकाराचे,
पडसाद जास्त गुंजतात!
छाया हेलकावत असतांना,
मी जवळ आले!
पण साखळी जेव्हा तुटली,
तेव्हा मी डोळे उघडून पाहिलं,
मोगऱ्यानं हसून मला गुरफटून टाकलं!

## ३४. नाळ

लांबच लांब दूरदूर
कात पसरवत उदासवाण्या संध्याकाळी
नि:शब्द स्तब्ध उभा माळ-!
रूक्ष कोरड्या सुप्त जीवनाचा,
अंश अंश पेलतांना त्याचे डोळे,
निर्विकारच!
मऊ सोनसळे केस गुंफताहेत!
लाटालाटाचं नर्तन मागंमागं सरकतंय!
धूसर धुंद कुंद प्रकाशात,
लवचिक पात्यांचे टोकदार बिंदू
उगाचच थरथरताहेत!
या गूढ प्रकाशात,
झाडांनी पाकळ्या मिटल्याहेत!
वेढणाऱ्या फांद्याचे पाश
निश्चिंतपणे गुरफटलेत!
असं जीवन एकाकी जगत
असं जगावं असं वाटतं!
कधी कधी जर चुकून,
चार थेंबांची उधळण झाली,
तरी अंकुर तरारून वर येतात!

एकाकी अवस्थेतला,
संगीताची साथ आहे!
या रिकाम्या नि:स्तब्धतेतला,
सतत घुमणारा नाद आहे!
जो फक्त ह्रदयालाच ऐकता येतो!
माळ मात्र तसाच उभा!
मख्ख चेहऱ्यानं किंवा
निर्विकार म्हण...!
आयुष्यात किती अलिप्तता असावी?
सीमतेतच घुटमळणं तुला पसंत नाही!
सर्व बंध तोडून,
अलिप्त नि:स्तब्ध माळाचा,
आशीर्वाद मी आता स्वीकारू का?
कारण जेव्हा आकाश बरसेल,
तेव्हा त्याच्या अश्रुंनी जर
माळाला कोंब फुटले तर,
माझ्या व्यक्तित्वाची मोरपिसं गळून पडतील!

## ३५. गुलमोहर

प्रीतभरल्या त्या एकट्या पायवाटेवर,
आपल्या लाललाल अंगारपुष्पांची,
उधळण करत गुलमोहोर उभा आहे!
जेव्हा रविकरांचे हस्तस्पर्श मंदावतात,
भावनाच्या विश्वाचा विस्तार आकसतो,
आणि जगाचे व्यवहार पेंगू लागतात,
त्या धूसर धुकाळ संध्याकाळी,
गुलमोहोर पुनर्जन्म घेतो!
अस्पष्ट गोड कुजबुजींचा,
लटक्या रूसव्यांचा,
मोहक खळखळाटाचा,
रंग लेऊन गुलमोहोराची,
काया तरारून उठते!
नाजुक लताप्रहाराने अशोकवृक्ष
बहरास येतो!
पण गुलमोहोराला प्रेमभरला

एकच कटाक्षही पुरतो!
तरुण टवटवीत,
मखमली हरितक्रांती,
आणि रात्रंदिवस लाजलाजून
खाली मान घालून बसलेली लाजरी
लालचुटूक फुलं!
ज्यांनी अप्सरांचं अधरपान केलंय!
मखमली, लाललाल पाकळ्यांची ,
पखरण घेत घेत,
डोळे मिटले तर,
नंदनवनाचं दर्शन होईल!
ज्यात पुन्हा गुलमोहोर इंद्र असेल!

## ३६. प्रतिध्वनी

वारा स्तब्ध विसावलेला!
शब्दांचे अर्थ रेंगाळलेले!
विरत विरत जाणारे सूर मात्र उदासलेले!
जेव्हा प्रकाशानेही मिटले डोळे किलकिलवले,
तेव्हाच पाहिली आर्त साद मशिदीजवळच्या ,
शुभ्र फुलांनी घातली!
आणि मी हेलकावले नि:स्तब्धतेत!
जेव्हा मीच ती साद ओठांनी टिपली!
पण प्रतिध्वनी मात्र घरंगळून गेला!

## ३७. सोनचाफा

मंद मंद!
धुंद गंध!
छेडलेल्या सतारीचा!
शांत शांत,
स्तब्ध हास्य,
लाख लाख,
चांदण्या उधळल्या!
हे असेच,
मिटलेले फूल,
पाकळ्या पाकळ्या,
विरघळलेल्या!
हरवलेल्या इंटिमेंटचा,
सूर धुंद विरलेला,
तो पिऊन,
सोनचाफा रसरसलेला!

## ३८. का?

मीच का
नेहमी कळावे?
हेच ते
जाणीवेचे अंधत्व!
ज्यांनी मला
फुलवेडे केले!
डोळे घट्ट बांधून
मी जेव्हा,
रंग खेळले,
तेव्हा मात्र,
खरोखरच मी तुला
हरवले!
हेच आहे ते
प्रलोभन! जे
मला खेचते!
मोहवते!

## ३९. चिरंतनत्व

पहिल्या दिवसाच्या,
अस्फुट पहाटेच्या,
गुलाबी धुक्यात,
जेव्हा सूर्याची सोनकिरणं किणकिणली,
आणि विश्वानं पहिला श्वास घेतला,
तेव्हाच विश्वकर्त्यानं एक वर दिला!
जीवन वहात राहिलं!
कालप्रवाहात कितीतरी,
असंख्यांची सांख्य सुखदु:ख वाहून गेली!
क्षणिकांच्या स्मृतीच्या वाळूतल्या
पाऊलखुणाही पुसत गेल्या!
सतीत्वाचं प्रखर तेजही विलोपलं!
रमणींच्या सौंदर्यासाठीही
काळ थांबला नाही!
प्रसंगांची वीण गुंफत गुंफत
काळ धावतच राहिला!
शिरेवरून जलौघ खळाळतांना

एखादाच मोती जोपासणारा
शिंपला कपारीत अडकावा,
तसं या सर्वगाही कालप्रवाहात
फक्त एकच गोष्ट चिरस्थायी रहाते!
मोनालिसाचं अद्वितीय गूढ हास्य!
चित्रांकीत करणारा कलाकार!
पिनाकपाणीचं तेजोमहात्म्य!
वेरूळाचे कैलास!
या चिरंतन स्मारकांची
स्फूतिदात्री सरस्वती जेव्हा हसली,
तेव्हा जगाला कला मिळाली!
जगानं कला ओंजळीत झेलली
जी चिरंतन आहे!

## ४०. मुग्धता

मी कितीतरी दूर रहावं
याला सीमा आहे का?
न गुंतण्याचा प्रयत्न करावा
हे तरी शाश्वत आहे का?
मनाचे भाव तर
उलगडतच नाहीत!
क्षणाक्षणाला बदलणारी चित्रंच,
नुसती पहावी म्हटलं तर,
क्षण ओंजळीतून निसटतात!
मी यापैकी काय स्वीकारू?
उभट रेखीव,
सुबक चेहऱ्याच्या महिरपीत,
तुझे
निरागस डोळे!
ज्यांनी उत्सुकतेला जागं केलं!
जीवनात अस्थिर असूनही,

तारुण्यातही किशोरवयातली,
मुग्धता दर्शवणारे, हे तुझे
भावपूर्ण डोळेच मला
खिळवतात!
शब्द ओठावर येऊनही मी जेव्हा
अबोल राहते तेव्हा,
तेच मुग्धत्व मला रोखून धरतं!
एका नजरेत काही व्यक्तवतांना
मी अपूर्णत्वाची चाहूल घेते!
याच मुग्धतेनं अशक्य केलंय मला
अलिप्त राहणं!

## ४१. हास्य

हास्य हास्य
खळखळले!
शब्द शब्द थरथरले!
रेखीव नितळ शुभ्र,
कुंदकळ्या विलगल्या!
मंद मंद स्मितमाला
रंग तरंग उधळले!
मुग्धता तशी
तिथेच थबकली!
भाव स्पर्शता
मिटून मिटून उमलली!
अबोली निरागसता!
जिच्या डोळ्यात मी पाहिले
माझेच प्रतिबिंब!

## ४२. झरोके

असंच कधी,
झरोक्यातून जग न्याहाळतांना,
मनाचे कप्पे उगीच उलगडले!
जेव्हा जेव्हा,
मैफलीत स्वरांची बरसात व्हायची,
रात्र विरहिणी होऊन,
सारंगी छेडायची,
तेव्हा,
अशाच झरोक्यांना,
फुटायचे मधुर कंठ!
जेव्हा त्यांना लावण्य ओठंगायचं!
जगात दडलेलं,
ठायी ठायी दबा धरून बसलेलं!
जहरच ज्यांना दाखवलं जायचं!
त्यांच्या उत्सुक नजरांचे
शुभासाठी व्याकुळणे होते ते!
ज्यांनी कधी
मऊ मऊ चंदेरी सोनेरी प्रकाशात,
स्वत:ला कधी न्हाऊ दिले नाही,
ज्यांचं मनही कधी ओलचिंब होऊ,
शकलं नाही,

फक्त रात्रच,
ज्यांनी आजवर पाहिली!
काळोखाशी बंधानी निगडीत होणाऱ्या,
व्याकुळ जिवांचे हे विसावे होते!
मुग्ध रात्रीचं मदभरं चांदणं,
पिऊन ज्यांना विषवत झालंय!
प्रकाशाला वेढायला
ज्यांचा कण न् कण तळमळतोय,
अशांशी स्वप्न साकारायला,
याच झरोक्यांना कंठ फुटायचे!
जगाचं गुपित कुजबुजत,
झरोके हास्य करीत उसळायचे!
पण गायत्रीच्या गंभीर ओंकारात,
प्रकाशपूजकांसाठी मात्र,
त्यांनी आपले ओठ कायम मिटून घेतलेत!

## ४३. शाप

माझ्या मुग्ध,
कोवळ्या प्रतिभेला,
तुझ्या तिरस्काराचा शाप!
सुरेल अबोध गळ्याला,
मिटू मिटू पहात्या
कटु बोलांचा शाप!
सांग! कशी मी
डोळे न मिटता
सूर्योदय पाहू?
माझ्या निरागस सुरांना,
डोळ्यांचा विखार जाळत आलाय!
माझ्या या अस्फुट
प्राजक्ती प्रतिभेच्या
आविष्काराला,
विषारी शब्द जाळून कोळपवताहेत!
माझ्या गंधवेडाला
मूर्खपणाचा शिक्का चिकटवलाय!
भावूक भोळ्या काव्यवृत्तीला
अव्यवहार्यतेची कुऱ्हाड मारलीय!

सुरांचं चांदणं
मार्गातच अडवलंय!
तुमचे शाप भोगत
मी कशी चौफेर बहरू?
माझ्या निर्व्याज,
कलावैभवाला,
तुमच्या विषारी शापांची,
दग्धता जाळतेय!
माझं निरोगी जीवन,
तुमचेच शाप करपवताहेत!
ज्यामुळे माझं आयुष्य
खचत चाललंय
मृत्यूच्या धुक्यात!

## ४४. तोल

नको देऊस मला चांदण्याचे पेले!
नको स्वर्णीम झळाळती ही कषायवस्त्र!
नको बेहोष धुंदता!
सुख दुखतेय!
धुंदतांना
तोल तरी सावरू दे रे!

## ४५. चाहूल

वाळूच्या घड्याळातून
कण निसटावे,
तसे आयुष्य संथ उतरणीवरून
ओघळत चाललेले!
कार्यासाठी जेवढ्या इच्छा
धरल्या त्या तृप्त करतांना,
ध्येयाकडे जातांना,
काल चाहुलच घेतली नाही!
दृष्टीपथात जेव्हा
साफल्य आले,
तेव्हा पाहिले,
की आयुष्यच
फार थोडे उरलेय!

## ४६. बेहोषी

चढती धुंद रात्र असावी!
चांदण्याची मदभरी बेहोषी!
पिऊन,
स्वरांच्या राज्यात हरवलेली!
छेडणारे, वेढणारे,
व्याकुळणारे सूर!
ज्यांच्या क्षणिक अस्तित्वाला,
हृदयाचे मोल!
व्याकुळ आर्ततेचे निनाद,
मन:पटलावर उमटतांनाच,
लखकन् -
निरभ्र आकाशात वीज चमकावी,
तशी,
तुझी माझी नजरानजर!
जिने मला पुरतं,
घायाळ करून सोडलंय!
भाबडा चेहरा,

अर्धनिरागस डोळे,
ज्यांचे रोखून पहाणे मला,
अस्वस्थ करते!
तुझ्या सहेतूक हास्यातून,
निर्मलतेचा आल्हादक गंध,
स्पर्शून जावा,
तसा मैफलीत
स्वरगंध उधळतो!
पण
पुनः पुन्हा रोखून पहात
कां उगीच मला घायाळ करतोस?

## ४७. नाद

अखंड ओघळणारे,
असंख्य ध्वनी!
मऊ मुलायम घर्ष ध्वनी!
अंतराच्या कोन्याकोन्यात,
दडून बसणारे ध्वनी!
हवेहवेसे वाटणारे शांत स्वप्न,
कधी पुरे होणारच नाही!
ज्यासाठी मन आसुसलंय,
ती स्तब्ध शांतता,
कधी या मर्त्य जगात,
मिळणारच नाही!
या नादांच्या माझ्या जाणीवा,
कवाडं मिटावी तरी,
अनाहत नाद घुमतो आहे!
आदिनादाला अंत नाही!

आदिनाद ब्रह्मनाद!
सुरासुरातून उदय होत!
जाणीवा नादमुग्धावस्थेत,
विसावल्या आहेत!
कळ्या फुलं हुंगतांना
वाट मी कशी चुकले ?
त्या स्वर्गनगरीत
मेजवानी (काव्याची) चाखली!
धुन्द गंधाने
आनन्दीत जाहले!
शुभेच्छा देऊनी,
कळ्या हुंगण्या चालले!

## ४८. अवेळ

कातरत्या हळव्या
ओल्या पापण्यांवर,
मन अजून झुलतंय गं!
ओल्या मेंदीभरल्या
चुड्यात मन अजून गुंतलंय गं!
सळसळत्या गर्भरेशमी
शालूच्या स्पर्शात,
मन अजून गुंगलंय ग!
कशी अवेळ दाटून आली
नि तुला घेऊन उडून गेली ?

## ४९. बिदाई

मी जाऊ?
फक्त माझा हा मृतदेह!
त्यावरची चादर जरा सरकव!
पांढरे फटक नाजूक हात दिसतात ना तुला?
फार पूर्वी,
हेच हात गुलाबी होते!
ह्याच मऊ तळव्यांनी,
एकमेकांना बिलगून,
कितीतरी स्वप्नं रंगवली होती!
कितीतरी आशांचे मनोरे उभारले होते!
आता त्याच आठवणी,
ह्या भेसूर तळव्यांवर मृत होऊन
विसावल्यात!
आज निस्तेज सताड उघडे हेच डोळे!
ह्याच डोळ्यातून,
कधीतरी चांदण्या सांडायच्या!
नासिकेचे गुलाबी अग्र,
थरथरत हेच डोळे,
तेव्हा आकाशाकडे झेपावू पहायचे!
तेज उधळत,

ह्याच डोळ्यांनी,
गगनाला गवसणी घालण्याची,
स्वप्नं पाहिली होती! होय ना?
पण ज्या क्षणापासून,
समुद्रराग आळवणं,
वाऱ्यानं बंद केलंय,
तेव्हापासून वीजच लुप्त झालीय!
या जगातून,
चैतन्य उडून गेलंय!
उरलेले हे निर्जीव डोळे!
ज्यात जीवन अन् मरण,
एकाच मापात तोलतात!
अशा कालखंडाच्या अनंत
सफरीला निघालेत हे डोळे!
मीही जातेय प्रवासाला!
त्याला दिशा नाही अंत नाही!
आहे फक्त शिथिलतेने वेढलेले औदासिन्य!
मी जाऊ का?

## ५०. भावगर्ता

वाणी जिथे मुक्त आहे
तिथे शब्द वलयं फेकतात!
शब्दांसाठीच तिथे रोषणाई असते!
लकाकणारे किरण फेकत,
शब्दप्रभाव झगमगतो!
त्याहूनही खोल आहेत,
त्याहूनही दूर आहेत,
भावगर्ता!
तिथे शब्द मंदावतात!
निखारे क्षीण होतात!
तिथे फक्त असते,
नजरेची भाषा!
वाणी तिथे स्तब्ध होते!
तिथे दृश्य नादाविष्कार नको!
फक्त दृष्टी मोहिनी साकारते!
त्या तिथे पलिकडे,
मी रहाते!
माझ्या ओठात वाणी मुग्ध आहे!
गारठल्या ओठात वाणी मुग्ध आहे!
गारठल्या नजरेतली,
ठिणगी विझलीय!
माझा मार्ग कोणता?
शब्दफुलांनी झगमगणारा?

छे!
माझा मार्ग अनंतातून जातो!
जेव्हा माझे शब्द उमटतात!
तेव्हा अनाहत नादप्रतिमा उमटतात
अनाहत नादलहरी कंपतात!
अनाहत नाद घुमतो!

▯ ▯ ▯

## ५१. स्वराश्रू

या क्षणरात्रीत
शब्द माझे मिसळलेले!
तूच घेऊन जावे,
गंध श्वासात दरवळणारे!
जा, फुलांचे धनुकमल विंधून जा!
छाया तुजसाठीच स्थिरावते!
खगा तिथे कलरवा जा!
जिथे रात्रीची मंत्रमोहिनी,
सूरराज्याला मंत्रवते!
ज्यासाठी आज उधळले
रंग सात सुगंधित मी!
तिथे फुलवेल काया,
तराणे नक्षीच्या गार सावलीत!
निळाई घेत विश्रांती!
तिथेच गवसेल! स्वप्न तुला!
ज्यासाठी आजवर
तू गाळलेस स्वराश्रु निळे!

## ५२. प्रतिध्वनि

अंधकाराच्या,
भयाण लाटेवर,
गारव्याचा शहारा!
एकाकी पायवाटेवर,
घुमणारा,
धूत्काराचा,
पडसाद!
सावल्यांबरोबर
हेलकावणारे वृक्षांचे
सर्पाकृती हात!
सकंप डोहावर
आदळून,
परत येणारा
तो प्रतिध्वनी!

□ □ □

## ५३. आवेग

क्षितिजाने आलिंगले,
चंद्रबिंब विशाल!
उरी घेऊनी असंख्य श्वास,
तृष्णेनं निमाली आवेग तृष्णा!
मी जाऊ?
क्षणभर नयन थबकले!
मनमोहिनी स्तब्ध!
थांब ना जरा,
वेग साहू दे!

□ □ □

## ५४. बहार

शुक्ल चांदण्यात न्हात,
पाऊल ओले मी उचलले!
गारठ्यात शिरशिरी,
अवघा अणूरेणू व्यापून गेली!
स्निग्ध चांदण्यात स्नात,
नक्षी मेंदीची वावरली!
सुरांचे चंदेरी वस्त्र लेऊन,
काया माझी मोहरली!
ए, थांब ना जरा!
अलगद रातराणीची फुले,
माझ्या स्कंधावर ओघळली
मिटत धुंद डोळे,
मी बहारात विरघळून गेले!

□ □ □

## ५५. सूर

स्तब्ध रात्रीच्या
धुन्द काळोखात,
तिच्या शुभ्र वस्त्रांचा झंकार!
थरथरणाऱ्या दिव्याच्या ज्योतीत,
गुलबक्षीची फुले ओघळतात!
स्तब्ध उभी तिची छाया!
मुग्ध चांदण्याने पाऊल तिचे जखडलेले!
आर्त डोळे बावरे,
गुपित उलगडले!
स्तब्ध तिच्या शुभ्राकृतीने,
अंधोर शिल्प कोरलेले!
स्वप्नगांधाराच्या नगरवेशीवर,
तिचे पाऊल थबकलेले!
दुह्रन तरंगत,
ऑर्गनचे सूर!
तरंगते मूक आव्हानात्मक,
हळवे आर्त सूर!

पाऊल थरथरवणारे सूर!
मिट्ट काळोखाच्या पडद्यातून,
रोखलेले तरल नेत्र त्याचे!
तिचे डोळे क्षणभर,
ठिणग्या तेजाळतात!
परत चंद्र अभ्राच्छादित होतो!
नुपुरांचा झंकार विरत जातो!
सूर नुसतेच विरत रहातात!
आर्त सूर नुसतेच फिरत,
रहातात तिच्या शोधतात!

## ५६. कशी येऊ

तुझ्या माझ्यात,
अंतर फक्त सात पावलाचं!
पण मी कशी येऊ?
माझे डोळे मंदावलेले!
मेंदी फिकटलेली!
रात्र नक्षी चढवून,
निघून गेली तरी!
सूर मुके राहिलेले!
दिवस वैरी झालेत!
मुक्या ओठांना,
रक्ताचे पुसट थेंब!
डोळ्यातल्या काजळरेखा,
पुसटताहेत!
ह्दयाचे कंप स्थिरावताहेत!
तुझे उत्सुक बाहू,
माझे आर्त नेत्र,
पण या
मृत मनानं
मी कशी येऊ?

माझे पाय बांधले आहेत!
माझे डोळे खिळवले आहेत!
मला साद आहे,
तुला न भेटताच येण्याची!
पैंजणातला नाद हरवून,
गीतातले सूर हरवून,
डोळ्यातलं तेज मालवून,
कशी मी येऊ?
कशी मी तुला सामोरी येऊ?

□ □ □

## ५७. रात ढलती जाये!

रात ढलती जाये!
नींद बैरन सताये
मन मेला जले
दहन लागे चाँद-किरन
ऐसेमे कोई
अपने आंखोकी
मुस्कान देकर
मुझे जगाये

## ५८. शिल्प

ठिबकत्या चांदण्यात,
वैरिण झाली रजनी!
मुके सूर माळून,
हिरवा गजरा लेऊन,
स्वप्नगुंफेच्या दारी,
उभी प्रतीक्षा सावळी!
धुंद वादळात,
ओष्ठशलाका पेटलेली!
नगरात दिवे मंद मंद
होत गेले!
चांदणे चढत गेले!
त्या नगरीचे
धूसर वस्त्र विरघळून गेले!
स्वप्नज्योती वितळल्या!
'ए थांब ना जरा'!
चाहूल स्पर्शून,
डोळे मिटले!
श्वासांनी तो गंध,
पिऊन घेतला!
पुन्हा पुन्हा आठवण्यासाठी,
आभाळाच्या हृदयानं ते शिल्प,
कोह्वन ठ्ठेवलं!

□ □ □

## ५९. आत्मस्तब्ध

रात्र पौर्णिमेची काळी,
रेशमी बाहूत ढळली आहे!
ह्रपेरी मदभरे किरणचंद्र,
जलाशयी प्रतिबिंबिताहेत!
किर्र किर्र वारा हुरहुरतो!
संथेतली चरी पाडत,
आक्रोश थरथरतो!
कुठेतरी डहुळते
प्रतिबिंब काचेरी!
पापण्या थरथरताहेत,
जिथे रात्री अनंत आहेत,
नि श्वास स्तब्ध आहेत,
त्या स्वर्लोकीच्या,
नंदनवनात,
हे आत्मस्तब्धा,
मला घेऊन चल!

▯ ▯ ▯

## ६०. अतृप्त

सूर माझे,
अतृप्तच राहिले!
मी फुलांनी स्पर्श चुंबले!
रक्तकणांनी,
आभाळ कवटाळले!
स्पर्शासाठीच प्राण माझे,
थबकले त्या रक्तिम दुपारी!
माझ्या स्पर्शानं,
दाह पेटला धुंद चंदनी वनात!
तप्त झालेल्या
मृदुंगाने दिली साथ!
प्राण विसावा घेऊनही,
मन मात्र तृषार्तच राहिले!

## ६१. नशा

तुझ्या पिंगट नेत्रात,
तरळली माझी छाया!
नि तू कावराबावरा!
भुरभुरते केस आवरत,
निरर्थक डोळ्यांचे लपंडाव!
शब्दशिल्प कोरणारी,
ती रेखीव बोटे!
जेव्हा माझ्या केसांवर विसावली,
तेव्हाच गाल तुझे लाल लाल!
शायराची नशा,
तुझ्या बेहोष डोळ्यांत,
क्षणभरच तरळली!
नि तेवढाच क्षण,
मी माझ्या ओठांनी,
टिपून घेतला!

▯ ▯ ▯

## ६२. मुंग्या

धगधगत्या ज्वालांत,
वेढलेला समभुज त्रिकोण!
आणि फ्रीजच्या गारगार काळोखात,
सुस्तावलेला स्कॉच!

फ्लॅशच्या झगमगाटात वीज बावरतेय!
चमचमत्या नॉयलॉनच्या रिंगणात,
संस्कृती आक्रोशते आहे!

रंगीबेरंगी चेहऱ्याचे बेगडी पुलाव!
नि खदखदून रटरटणारा हिडिस विनोद!

दूर स्मशानात जळणाऱ्या,
चितेतली राख,
एक वेडा फासतोय कपाळाला!
आणि मेलेल्या जाणिवांची लक्तर लोंबवत,
बगळ्यांची माळ विसकटत,
वारा कापत चाललीय धार!

खळखळत्या बेड्यात
गुंतून गुंतून, मातीचं ढेकूळ भुगा झालंय!
अन् वेड्यामुंग्या -
लगबगीने साखर गोळा करताहेत!

▯ ▯ ▯

## ६३. एकांत

वितळून जात आहे,
हे तुझं हिमगौर अंग,
चंदनस्पर्शी गारव्यात!
सादेच्या चाहुलीचे,
गंध !
मृत हृदयस्थ
गारव्यातून पिऊ दे!
देहबंधनाचं मूक नृत्य
ज्वालेत हसू देत!
मिटू मिटू होत्या प्राण पाखराला
संथतेचं निद्रा रसायन
पिऊ देत!
निवांत धुंद हा एकांत!
देहविणा झंकारत!
अबोलच किती ठेवू?
आंतरिक माझं हिममन...?
चांदण विसरलीय,
स्पर्शदाह विराणी!
चंदनाच्या तप्त मधाळ स्पर्शानं,
काहूर उठवलंय!
लाटा विव्हन स्तब्ध झाल्यात!
सखे सांज झाकळली!
जाऊदे असे उगाच,
प्रतिबिंब व्हपरी विव्हन तळ्यात!

▯ ▯ ▯

## ६४. वाट

किती दिवस झाले?
भिजले नाही मी दंवबिंदूत!
किती रात्री तळमळल्या,
माळला नाही मी मोगरा केसांत!
किती श्वास रोखले,
हसले नाही मी खळखळून!
किती वाट पाहू,
या एकाकी वाटेच्या वाटसराची?

## ६५. गारवा

दिवस झाले मुके,
अन् सूर सूर सुकलेले!
इथल्या आभाळाला
धुकं वेढत गेलं!
माझे मुके शब्द अचानक विरघळत गेले!
दिवस इथले रंगांधळे!
रात्री साजाविण नटलेल्या!
नुपुरांचा शाप लेऊन,
खिडक्या ह्रसून बसलेल्या!
शब्द इथले मोरपंखी!
देह सारे बधिरलेले!
मुलाम्याला नटलेले!
फक्त मिळतो चिरगारवा!
झोंबणारा, शहारणारा!
गारव्या मृत दिव्यात,
स्वप्ने गोठलेली!
दुःख उभं आहे या इथं,
रंगांची साजचोळी लेऊन!
जाणिवांचे कवडसे,
केव्हाच बोथट झालेत!

सतारीचे सूर,
इथं न येताच
दूर धावत गेले!
रात्री भोवती भिरभिरतात,
फक्त स्तब्ध थरथरत्या,
जीवघेण्या सावल्या!
एकांती साथीला,
फक्त गारवा!
धुकाळ स्पर्शी चांदण सांडवत
रात्री मालवलेली
मंद दिव्यांच्या अंधुक उजेडात,
बधिरता जरा वितळते!
अन् मी हळूच,
डोकावून बाहेर पहाते!
उबदार सोनेरी जगात,
फक्त क्षणभराकरता!

## ६६. पडसाद

सळसळत्या,
नवथर, नागमोडी पायवाटेवरून
पावलं उमटत गेली!
काळ्याशार
डोहात लुप्त झाली!
खुणांचे पडसाद मात्र,
मातीनं असे टिपून घेतले,
की,
त्या पडसादांच्या
प्रतिमांनी,
आभाळानंही
हुंदका दिला!

▯ ▯ ▯

## ६७. कोन

कोन कसे असतात?
झुकते, हलते कोन,
कसे सरकतात?
सरळ रेषेत वाढणारे,
टोकाला किंचित,
मुरडणारे कोन!
कसे रोखून पहातात?
एकमेकांना छेदणारे,
छेदता छेदताच,
एकमेकांना बिलगणारे रंग!
कोणते गीत गातात?
रंग अन् कोन तर,
एकमेकांना खुणावत नाहीत ना?

## ६८. वारे

हिवाळ्याच्या अंतरंगातून,
स्तब्ध वारे,
धावत येतात!
एकाकी किल्ल्याच्या,
तटबंदीवर,
काजवे उगाच लुकलुकतात!
प्रतिकार कवटाळत,
दुधाळ प्रकाशाचे,
झोत वारे अडवतात!
लाटा वेटोळतात!
निळे हसणारे तळे!
कुठे आहे त्यातला प्राण?
निर्जीव कलेवरात
मिसळलेले मन चीत्कारते!

▯ ▯ ▯

## ६९. क्षण

क्षण वहात गेले!
रिते दु:ख भळभळत राहिले!
त्या सांजेच्या,
खुणा डोळ्यात साठवत!
रक्ताळलेले,
सुकलेले,
क्षण मात्र गोठून राहिले!
एका रात्रीचे,
काह्रण्य डोळ्यांत,
लपवत!
क्षण काही असे
परदेशी झाले!
की स्वत:ला झोकणेच,
अशक्य झाले,
त्या गर्द नि:श्वासांच्या छायेत!

▯ ▯ ▯

## ७०. डोह

कुठे गेले ते निश्वास?
त्या सांद्र वेळी,
उसासणारे अश्रू?
थेंबाथेंबात,
पाझरणारे,
डोळे बुडत गेले!
त्या गहिऱ्या बेचैनीत!
त्या धुंद मस्तीत,
कसली आहे ही नशा?
मत्त !
मस्त!
बेभान!
पण डोह फसवे असतात!
नशेलाही क्षणांचे बांध आहेत,
हे या उद्दाम मस्तीत विसरशील?

□ □ □

## ७१. मोहर

तू ढाळशील चार अश्रू?
माझ्या जिवंत समाधीवर?
की सोडून देशील त्या समया,
सुन्न वाहत्या नदीत?
डळमळणारे शब्द,
हरवलेत त्या स्मशानात!
तप्त तृषार्त मोहर,
अजूनही फुलतोच आहे,
अंगांगात!
प्रहर रिते ओले,
भिजवताहेत क्षणांना!
पण समाधिस्थ स्थित
चाळवतात अंधाऱ्या दुपारी!
मंद निस्तब्धतेत!
तू येशील नं?
विखुरलेला मोहर गोळा करायला?

▯ ▯ ▯

## ७२. घर

दूर दूर गेले घर!
काळोखाची माया सांडवत!
किरणं अशी तेजाळली,
की स्वप्नांचा चुरा,
अजून घरंगळतोच आहे,
या उदास एकल्या आयुष्यावर!
सुन्न काळोखात!

## ७३. मोह

अंगांगात पलाश फुलवणारा!
ओठांवर लाली उमटवणारा...
अर्धस्वप्निल जागृतीला,
थंडगार दाह देणारा!

□ □ □

## ७४.व्यथा

ज्या क्षणी,
निश्वास थबकले,
ज्या क्षणी,
अशक्य झाले जिणे!
या भोवऱ्यात!
तू निघून गेलास,
तत्क्षणी!
अस्तित्वांची एकही खूण
न ड्ढेवता!
फक्त तुझ्या व्यथा,
आर्त हंबरत राहिल्या
पण-
जे निश्वासांच्या,
सावल्या आहेत,
त्यांनी,
कोणती संजीवनी
कवटाळावी?
हुंकारणाऱ्या तळमळत्या
दग्ध मनासाठी?

□ □ □

## ७५. चिरनिद्रा

जसे या जगात जन्मले,
तसे कळून चुकले की,
इथे आपले कुणी नाही!
इतरांचे धाक,
इथं बांधून ठेवत राहिले आजवर!
जसे गिधाड सडके मांसखंड,
धरून ठेवते!
कळून चुकले हेही
कां हे जिणं असह्य आहे!
परतंत्र जगणं,
शक्य नाही!
आता इथे,
बांधून ठेवणारे पाश नाहीत!
मायेत पदर गुंतणार नाही!
कारण कळून चुकलंय,
की माया ही माया नाही!
तो आहे बेगडी मुखवटा!
घराण्याची खोटी,
व्यर्थ तोटकी प्रतिष्ठा,
राखायला धारण केलेला!
कधीकधी वाटतं
ओढावे सपासप फटके!
या मुखवटाधाऱ्यांवर!

पण दुसऱ्या क्षणी मन किंचाळतं
'तुझं कोण आहे इथं?'
आता जावंसं वाटतं,
त्या चिरनिद्रेत!
जिथे मला कुणी बघणार नाही!
विषारी नजरेचा धाक वाटणार नाही!
दडपण उरणार नाही!
म्हणून आत्मघात हे,
पाप ङ्करत नाही!
गुडबाय...!
चालले मी!
दूरच्या प्रवासाला!
थकलेल्या पापण्या,
आपणच मिटवायच्या!
भह्न आलेले पाय,
आपणच चेपायचे!
शेवटी कलंडायचं,
त्या गार निद्रेत!

## ७६. ओऑसिस

जगायला काय लागतं?
अन्न वस्त्र निवारा!
तो तर कसाही मिळतोच!
पण कुठेतरी मायेचा
अंधारही लागतो!
तरंगत्या हिमनगावर
उभं राहून,
ओऑसिसची स्वप्नं
कशी फुलवावी?

## ७७. उदास

आता खूप कंटाळा आलाय
तेच तेच आयुष्य जगतांना!
त्याच त्याच शब्दातले रंग
पार फिकटले आहेत!
फक्त आठवणीच जिवंत होत्या
त्याही कोसळतात!
वेढत येणारी ही उदासीनता!
तुझ्या डोळ्यांनी,
तू दूर साह्र शकशील कां?

## ७८. पाचोळा

मुक्या रजनीगंधेच्या,
जळत्या डोळ्यांनी,
एक निळे स्वप्न पाहिले!
पण पाचोळा भिरभिरत आला
अन् आभाळ अभ्राच्छादित झालं!

## ७९. रंग

ओठ मिटलेलेच राहू दे!
उडणाऱ्या ठिणग्या सोसणार नाहीत मला!
मिटत जाऊ दे,
वाती समयांच्या!
पण एक कवडसा,
ठेवून जा!
त्या जर्द आरशावर!
रांगोळीत रंग भरायला!

□ □ □

## ८०. पाऊलखुणा

दूरवर जाळीत,
रात विसावलेली!
चांदण्यांची झूल,
अंग अंग तगमगणारी!
नुपूरांचे बोल तिच्या
मुक्या ओठांत!
अडखळतात!
मुग्ध पापण्यांचे,
स्पर्श पिऊन घेत,
पहाट तराह्रन येते!
चोरट्या पाऊलखुणा,
पुसून टाकायला!

□ □ □

## ८१. फक्त क्षणाकरता

दिवस झाले मुके!
अन् सूर सूर सुकलेले!
इथल्या आभाळाला,
धुकं वेढत गेलं!
मुके शब्द माझे,
विरघळत गेले अचानक!
दिवस रंगांधळे इथले,
रात्री साजांविण नटल्या!
नुपूरांचा शाप लेऊन,
खिडक्या ह्सून बसल्या!
शब्द इथले,
मेणपंखी मुलाम्याने नटलेले!
देह सारे बधिरलेले,
फक्त मिळतो चिरगारवा!
झोंबणारा, शहारवणारा!
गारठलेल्या मृत दिव्यात,
स्वप्ने गोठलेली!
दु:ख उभे इथे,
लेऊन सांजचोळी!
जाणिवांचे कवडसें,
केव्हाच बोथट झाले!
सतारीचे सूर,

इथे न येताच,
दूर धावत गेले!
सावल्या थरारत्या स्तब्ध!
रात्री इथे जीवघेण्या!
एकांती साथीला फक्त,
गारठा!
धुकाळ स्पर्शी चांदणे सांडवत,
रात्र मालवलेली!
मंद दिव्यांच्या अंधुक उजेडात,
बधिरता जरा वितळते!
अन् मी हळूच डोकावून बाहेर बघते,
ऊबदार सोनेरी जगात,
फक्त क्षणभराकरता!

## ८२. घर

धूसर गारव्यात,
स्वप्नांचे दवबिंदू ठिबकतात!
सूर-
ओले, आर्त!
नि,
दूर दूर गेलेले घर!
नि:स्तब्धतेने गिळलेले श्वास!
तरंगत्या
स्वप्नशय्येवर पहुडलेले,
आर्द्र सांद्र सूर!
नि नकळत,
दूर दूर विह्वन जाणारे,
घायाळ घर!

## ८३. शिंग

चार शब्द तहानलेल्यांचे,
विह्रन जातात,
सनईच्या कोलाहलात!
अश्रूंचे ढग,
धूसर करतात,
तात्पुरते वास्तवाला !
त्याचवेळी उगारलेली
असतात, शिंगं
गरीब गाईनं!
आपल्या जिवावर उठणाऱ्या,
कसायाला भोसकण्यासाठी!

## ८४. मरण

केंव्हा दूर गेले,
धैर्याचे आर्त डोळे?
बुडून गेले,
खोल अंधाऱ्या गर्तेत,
मुके डोळे माझे!
आईच्या कुशीत झेपावलेले,
डोंगर वेटोळत गेले,
अनावर दु:ख ओले!
अंतराळाचे दुधारी डोळे,
नादाची आरपार काच!
काचेरी मण्यात स्फटिकाच्या,
प्रतिबिंबे निळी डहुळली!
दिवस सरला आहे केव्हाच!
बुडवून पावलं मायाजालात,
मी उरलेय एकली!
हजारो एकली मरणं,
स्वत:च्या निश्वासात,
बुडवून घ्यायला!

## ८५. प्राण

अजाणता कोरलास,
शिल्पलेख हृदयावर!
मी बावरी झाले क्षणभर!
त्या मंत्रमोहिनी नगरीची द्वारे,
तू उघडलीस माझ्यासाठी!
मी अजाण मुग्धा बावहृन गेले!
रस्ता मला माहित नव्हता!
ते मऊ स्पर्शगंध,
अपरिचित होते मला!
ती धुंद श्वासवादळे,
घुसमटून टाकत होती मला!
जीव व्याकुळत असतांनाही,
मी पुढे जात राहिले!
काहूर साद घालत होते मला!
निखारलेल्या शलाका,
आजूबाजूच्या ठिणग्या फुलवत होत्या!
ते अग्निकण गालांना,
स्पर्शत होते!
तरी मी चालतच राहिले!
कारण-
त्या लाललाल अंगारपुष्पात,
बाहू पसहृन
तू उभा होतास!

तुझेच निःश्वास मला,
संजीवनी देत होते!
ते प्रेमभरले डोळे,
ती जीवघेणी नजर!
मला थराह्रन सोडत होती!
मी आलेय!
पण धग असह्य होते आहे!
श्वास थकत आलेत रे!
ह्रदयही मंदावत चाललंय!
रात्रही ढळत आली आहे!
फक्त एकदाच मला,
ती साद घाल!
म्हणजे हा प्राण
तृप्त होऊन देशांतराला,
जाईल!

▯ ▯ ▯

## ८६.वादळ

रात्रभोर वादळात,
अंग अंग,
थरथरते!
अस्फुट चांदणे,
उतहून आले!
नक्षीदार कमानीवहून!
ओल्या खुणा,
उमटवत,
बेभान वादळ,
ज्योती थरथरत्या!
चर्चच्या घंटेचे
मालवते झंकार!
झेलता,
काजळी प्रतिक्षा,
अधीर उत्सुक सावली!
चांदण्यांच्या,
काजळकडा रेखून,
रात्र विरहिणी,
विराणी गात विरघळते!

▯ ▯ ▯

## ८७. गाठ

घेरत आले,
रात्रीचे डोळे,
बळी भावनांचा घ्यायला!
अंधार!
‘मी’त गुंतलेला!
मऊशार अंधार,
जाळत गेला!
मनाला!
गुंता सोडवू कशी?
तळमळते आहे,
स्वत:ला सोडवून,
चांदण्या भोगायला!
धावू कशी?
कारण माझी गाठ,
तुझ्या मऊसूत,
बोटांशी बसलीय!

## ८८. मोगरा

‘तुझ्या खिडकीत डोकावणाऱ्या
किनाऱ्यांवर चालतांना,
ती कबरी बुटकी बदकं थबकून वळून मागे
कां पहातात?’ तू म्हणालास!
कित्येक पावसाळ्यांपासून डोळ्यांवर बुरशी
चढत आली आहे!
जेव्हा हिरवट सूर्यप्रकाश त्वचेत भिनतो,
तव्हा काचेत चिरडून गोठलेल्या!
अळ्या,
कानांशी गुणगुणू लागतात!
संध्याकाळी थकून भागून,
निळ्या डोळ्यांचे समुद्रपक्षी,
या किनाऱ्यावर बसून
एक एक पीस उसवून लाटांत फेकत राहतात!
एकेका पिसावर कोरलेल्या असतात,
अमावस्येला वाजणाऱ्या चर्चबेल्स
(चर्चच्या घंटा आंधळ्या आहेत)!

माझे किनारे निसरडे, बुळबुळीत ओशट आहेत!
आपली पावलं आपणच जपून काचेत बंदिस्त करावीत,
नाहीतर बर्फाळ वाऱ्यामुळे तुझ्या
बुबुळांना तडे जातील',
मी म्हणाले!
'प्रत्येक पावलांवर आधीच रेखून ठेवलेली
लालसर स्वस्तीकं असतात,
फक्त ती पहायची असतील तर तू
केसात मोगरा माळू नकोस'
हसून तो उत्तरला!

## ८९. काळोख

आभाळात थेंबाथेंबाने,
पसरत जाणारा असहाय काळोख!
काळोखाला चेतना नसते!
स्पर्शही नसतो! असते फक्त जाणीव!
काळसर गिधाडांच्या चकाकत्या डोळ्यात,
काळोख नेहमीच थिजलेला असतो!
प्रत्येक वादळी रात्री,
चर्चमधल्या अंधुक उजेडात,
जळणाऱ्या मेणबत्त्यात असंख्य,
ख्रिस्त बसतात!
ते सर्व काळोखात माखलेले असतात
शेकोटीशी पाय दुमडून बसलेल्या तुला
चेहरा नसतोच!
तिथे असतात फक्त स्फिंक्सचे
धगधगणारे डोळे!
अर्थहीन रात्री तशाच सुस्त घरंगळत जातात!
पहाट पांगळी उगवते!
कारण तोपर्यंत तुझ्या
नसानसांतून वहाणारा काळोख,
केव्हाच गोठून गेलेला असतो!

▯ ▯ ▯

## ९०. किरवाणी

गालांना झोंबणारा,
प्रारब्धवादी हिवाळा!
अंधारात उखडलेले धुमसणारे डोळे!
किरवाणीत बुडून जात आहेत!
पाऊस पाखरे विव्हलवेणा देत,
आंधळी झाली आहेत!
अधू डोळ्यांतल्या,
कमजोर रक्तवाहिन्यात,
उसळी मारते आहे,
किरवाणीची अतृप्ती!
दूर दूर लाटात,
नागचाफ्याचे फुल!
अधांतरी,
एकटेच, दूर, दूर!
माझ्या ओठांत समुद्रं साकळला आहे!

## ९१. रात्री

मुसळधार पाऊस बरसतो आहे!
अशा एकल्या रात्रींना,
जळत रहायला,
मी वचनबद्ध आहे!
दुरून साद घालणाऱ्या,
अर्धस्फुट अंधाराशी,
मी वचनबद्ध आहे!
अशा कातर रात्री,
अंगावर दाटून येणारी,
तुझ्या मिठीची स्वरशिल्पे!
उदास आहे मन!
आलेल्या वाऱ्याला,
परतवून लावत आहेत,
माझ्या मंदिरातल्या,
अंधुक जळणाऱ्या मेणबत्त्या!
पुन:पुन: साकळत येते आहे
दूरवरून हलकी साद!
पायांनी बंध तुटून,
धाव घ्यावी,

इतका दमच राहिला नाहीये!
पांगळ्या पायात नुसतीच,
हुरहूर रहाते दाटून!
तुझ्या मिठीत घुसमटलेल्या क्षणांची,
याद करून टाकते,
पावसाला धूसर
अन् परक्याच होत जातात,
येणाऱ्या प्रणयी रात्री!
तुझ्या ओठात,
लपलेल्या स्वरांसाठी!

## ९२. मिठी

असा कोसळतो श्रावण,
अंगांगातून, आकाशातून!
बेभान रसरशीत श्रावण,
की डोळ्यात जाग येते,
गुडुप्प निजलेल्या,
आळसावलेल्या मल्हाराला!
मदालस श्रावणाच्या अर्धवक्र भरदार रेषा,
डोळ्यात अशा खुपतात, अशा भिनतात की,
जमिनीतून,
प्रत्येक थेंबानिशी,
इवल्याल्या रोपांऐवजी,
तराह्वन वर येतात,
उन्मत्त झुलणारे मोरपिसारे!
असा बिलगतो श्रावण अंगांगाला!
आभाळ मी, तू, अन्
श्रावणाची गच्च मिठी!
त्या दिवशी सरळ सरळ मला खेचून घेऊन गेला,
थंडगार झोंबरा वारा!

नको तिथं लगटत होता!
पहाता पहाता पेटत गेल्या,
एकापाठोपाठ एक मेणबत्त्या!
हलकासा झोत उडवत गेला,
मंदिर थेंब अंगावर!
आतून आतून उसळत गेली,
एक अनावर बेचैनी!
मी भान सावरले,
चैत्राच्या दुपारींना स्मह्वन!
पण तुझ्या उष्ण ओठांनी,
माझे हातच कलम केले!

□ □ □

## ९३. आषाढ

जेव्हा श्रावण संपून आषाढ लागतो,
तेव्हाच हळूहळू आपण होत जातो,
स्वत:लाच परदेशी!
आपल्याच स्पर्शाची आपण करतो
वेडी पानगळ!
भर आषाढात रानात मोर नाचतात!
आपणही त्याचवेळी जगत असतो,
अर्धतुटके एक ओलसर गाणे!
अंधाऱ्या कोपऱ्यात दुपारी मुरणाऱ्या,
ओलसर पोतेऱ्याइतक्याच आतुरतेने,
आपण शोषून घेत असतो,
अंतरंगात उडणाऱ्या ठिणग्या!
प्रत्येक आषाढात, रोजच ढगाळते आभाळ!
महिनाभर अंतरात फिरत राहतो वेगळेच काहूर!
ज्याची अक्षरे आपल्याला कधीच लागत नाहीत!
दाटून येते वेळीअवेळी वेडे आभाळ!
गळती लागते. चिंचेच्या लालचुटूक फुलांना!
थंड आगीत जळत राहाते,
न कळणारे सुनीत!

आषाढ संपत येतो!
पुन्हा आहेच आपले,
रोजचे संतापलेले आभाळ!
अन् इमानीपणे धागा धागा,
विणत जाणारा,
रोजचाच कोळी!
रोगग्रस्त अवयवाइतक्याच सहजतेने,
आपणही कापून दूर फेकतो,
मनात उगवू पहाणारी कोवळी हिरवळ!

## ९४. थांब

थांब-
बेभानपणे
शोधू नकोस,
असे श्वासाचे
गंध!
अंगगंधात मोरपंखी,
मोरपंख!
वितळले आहे,
मीत्व काचेरी!
निसटते क्षण,
घरंगळले तळ्यात!
जादूचे रान फुलले,
एकाएकी वेड्यागत!
उधळताहेत फुलं,
अजूनही,
धुंदीत!

## ९५. निखारे

केव्हा?
मी माझे श्वास
जाळून टाकले?
त्या भयाण वाऱ्यात?
रक्त ओघळतंच आहे,
थेंब थेंब!
निखारे काही,
मात्र अजूनही,
गारठले आहेत,
त्या वाऱ्यात!

## ९६. काजळी

काजळी धुंद रात्रींचे,
बेहोष थवे!
मग्न!
मस्त!
स्वत:च्याच नशेत!
एकाकीपणा,
भयाण आहे!
वेटोळून,
रात्रीच्या मिठीत!
तू येतोस ना,
तेव्हा
मिटीन हे डोळे,
ते दृश्य पहायला!
उधळते लालसर,
मेंदीचे रंग!
खुलत्या सांजेला,
ढगांचे ओहळ!
रात भिजूभिजू,
दाटून आलेली!
मन चिंब!

## ९७. मन

त्या नवेल्या मस्तीत,
हिंदकळते पाणी!
लालस मन,
ओढते पाय मागे!
जिवाचे रान!
प्राण दिले झोकून,
त्या निळ्या सांजेला!
आवर्त असे घोंगावले,
की मन,
अलगद बुडाले,
तुझ्या तळाशी!

## ९८. पावा

चिंब गारठा,
गात्र फुलोरा!
झाकळले पाय,
विसह्व नकोस!
डोळ्यांची भाषा!
नाहीतर वेडे रान,
घुमवेल पावा!

## ९९. मिठी

या कातर रात्रवेळी,
हे दु:खी चितांचे
गाणे!
स्मशानशांत हृदयात,
मुके पाखह्व तडफडते!
गार धुक्यात,
वितळते!
ही कळ मिठीची,
नि:श्वास घेऊनी पेटे!
तोवर बांधू दे त्याला,
तोरण श्वासांचे!

  

## १००. आठव

ओले कातर चांदणे,
धुकाळल्या ढगांत,
अधांतरी तरंगावे,
तसे तुझे पदरव!
पुनःपुनः आंदोलन,
एकाच स्वरावर,
स्थिरावावे,
तसे तुझे
तगमगते श्वास!
एकल्या रात्रीत,
बेभान वाऱ्याने शीळ घालत,
मोरबनातून फिरावे,
तसा तुझा आठव!

## १०१. धून

डोळ्यांनी वळून चाहूल घेतली!
अंधार -
नकळत झालेला!
तरंगत जाते धून,
हरवलेले शून्य!
हसरे चेहरे!
चौकटीतही सावली कां
वारंवार थबकते?
पण धून,
मला
स्पर्शलीच नाही!
दूरवहून अलगत निघून गेली!
शेजारची खुर्ची रिकामी होती
तरीही!

## १०२. षड्ज

मी भोगल्या आहेत कित्येक रात्री!
पहाट होऊन!
वेडे पक्षी रात्रभर धावले,
फुलाफुलांच्या डहाळ्यांमधून!
थंडावणारे रक्त पेटवत (रक्त निराश)!
तुझे डोळे बुडवून त्या रात्रीत,
तू षडज लावलास!
अन् अंगभर माझ्या,
थरथरले रोमांचाचे थवे!
षड्जाला धरत,
तू मी रात्री जगलो!
जेव्हां गंधार डळमळला,
तेव्हा दूऽऽर विरत गेलो!

▯ ▯ ▯

## १०३. ओटी

काळोखाला फुटलेत सूर!
माझ्या गळ्यात अडकला जेव्हा काटा,
तेव्हा तरी तू मागे वळून पहायचंस!
पण राहू दे!
रस्ता तरी काय,
रिकामाच होता!
वांझेच्या ओटीसारखा!

□ □ □

## १०४. कॅक्टस

जाता जाता वळून तिने,
फेकली रक्तफुलं!
तू, मी, किती खंतावलो!
उगाच वाढणाऱ्या वृक्ष,
खरबरीत कॅक्टस्साठी!

□ □ □

## १०५. वारे

फितूर रात्र वाहते प्रहरांनी!
जळबुडव्या अधरांचे गाणे!
फसवे ओले ऊन अनावर!
चंद्रबनातून चाहूल गाणे!
अधीर, उत्सुक तारे ढळले!
बुडत्या सांजप्रवाही हळूच!
वारे येऊन थबकावे!
देऊळ माथ्याचे निशाण कोरे!
लाजून चंद्र थरथरते!

## १०६.प्राणपाखह्र

ओली पापणी थरथरावी
तसे अलगत बोल!
काहूर रात्री तगमग,
जीव खोल मिटलेला!
हे उदास जीवन इथले
अर्थांचे रंग फिस्कटले!
गाता गाता गाणे,
तुटून विह्रन गेले!
खोल खोल हुंकार जागता!
गुंतली मने जळात!
आभाळ वेडे झाले!
लवकर संपव गाणे,
नाहीतर उडेल अलगद
प्राणपाखह्र बिचारे!

## १०७.फुलवात

भग्न केलेली
वास्तु पीत,
मी मुक्याने गात उभी आहे!
आात जीव थकला!
उरले फक्त श्वास तिन्हीसांजेचे!
तेवढी सुरई भरून दे,
पुन्हा त्रास नको,
भग्न देवालयात
फुलवात लावण्याचा!

## १०८.रात्री

रात्री पंजे उगाह्न
धावून आल्या!
मी उंच अंतराळात!
त्यांनी प्रहार केला,
उशीवरच्या माझ्या
निरर्थक प्रेतावर!
नि-
खदखदत निघून गेल्या!
काळोखात,
पुन्हा कुणालातरी
खोल एकांताच्या दरीत
ढकलून द्यायला!

▯ ▯ ▯

## १०९.संध्याकाळ

नैनीतालला म्हणे,
त्यानं भोगली एक
ओल्या हिवाळ्यातली संध्याकाळ!
त्याला कुठं माहित होतं,
की इथलीच संध्याकाळ,
त्याचा पाठलाग करत
तिथं गेली होती!
नि दबा धह्वन बसली होती!
ऋतू बदलले तरी
आभाळ कुठं बदलतं?

## ११०.फिनिक्स

गेल्या शंभर वर्षात,
एकशे पंचवीस वेळा
उठले मी थडग्यातून!
स्वत:चेच केस ओरबाडत,
तुटके ह्रक्ष केस
फेकून दिले वाऱ्यावर...!
जमिनीला स्पर्शताच,
एकेका केसानं
पेटवली रानं!
उध्वस्थ, धुकाळलेल्या व्यथांची!
कबरीत मी मात्र उरले,
स्तब्ध!
निरखत स्वत:चेच,
पेटून विझलेले,
सुस्त नि:श्वास!

## १११.घोडे

उद्या पहाटेला
भेटायला जातांना,
वस्त्रं बदलून जा!
नाहीतर,
जाशील तशीच,
विस्कटलेल्या केसांनी
उधळलेले घोडे आवरायला!

▯ ▯ ▯

## ११२. विष

भिंतीवरच्या ह्रंद खुंट्याचे,
दात विचकून
केलेलं हास्य शेवाळलेलं,
पाहिलं!
अन् जलाल
डंख भयंकर,
मन चाटून गेला!
पण-
तीस औंस डोस,
विषाचा,
पुरे होतो का?
एका ह्रंद भोपळ्याला
सप्कन चिरायला?

## ११३.खुणा

अजून ताज्या आहेत,
माझ्या केसांवर
तुझ्या चंद्रगामी खुणा!
पण तू कुठे मिटतोस?
पत्ता दिलास
तर पाठवीन भेट
काटेरी रानगुलाबांची!

## ११४. काजळ

काळ्या किनारीवर,
थरारते रंग
चाहूलींचे!
एकाएकी,
अचानक पळस फुलतात!
तुझ्या गात्रात बिलगल्या
शरदाच्या चिंबलेल्या दुपारी!
किनाऱ्याला लाटा नागमोडी चुंबाव्या,
तसे काजळ! तुझ्या नर्गिसी डोळ्यात!

## ११५. जन्म आणि मरण

अंतराळाच्या शून्य नगरीत
भरली होती सभा अस्तित्वांची!
शब्दाविणा संभाषण!
अर्थाविण सतारी!
छेडल्या जात होत्या!
अस्वस्थ सूर्य थबकून पहात होता!
जगापलिकडे पलिते,
त्याच्या आज्ञेबाहेर फिरणारे!
तोच बोलावणे आले
एकाला,
क्षणभर मूक कल्लोळ!
सभेचा विस्कटला नूर!
मरणात अलगद् उतरणं त्या एकाचं?
नसलेले बंध तोडून!
शेवटी तरी काय?
एक मरण आत्म्याचे नि त्याचवेळी
पुनर्जन्म एका देहाचा!

## ११६.नको

तू येऊन गेलीस म्हणे!
माफ कर!
प्लीज पुन्हा येऊ नकोस!
राखेतले अवशेष,
तुझ्या रेशमी केसात
माळू नकोस!

## ११७. बर्फ

शरदाच्या गारव्यात,
पाय पोटाशी घेऊन
पहुडलेला,
निळा गारवा!
अंग भिजले ना?
म्हणूनच तर
बर्फ थेंबथेंब ओघळत आहे,
भुऱ्या केसांच्या
बुरख्यावरून!

## ११८.वचन

मागितला नव्हता
तरी जन्म मिळाला!
व्याकुळले नव्हते
तरी शब्द येऊन बिलगले!
बोलले नव्हते
तरी सुरांनी मन भिजवले!
मागितले तेव्हा,
तू स्वत:चे डोळे
का दान दिले नाहीस मला?
बहुतेक विसरलास
पृथ्वीवर दिलेलं वचन!

## ११९.पडदा

असं तुला कां वाटलं?
पण,
अंतरच नाही मध्ये,
तेव्हा पडद्याचा प्रश्न
येतोच कुठं?

   

## १२०.सांजवात

वारा कधी बुडाला
त्या घनदग्ध रात्री?
स्वर मूर्त झाले,
उरल्या क्षीण दुपारी!
सरत्या बहारवेळा,
किती माळल्या फुलांनी!
बुडवून रात्र जेव्हा,
आलीस पैजणांनी!
प्राणात उरले काय?
पाखरे दूर गेली!
जळ शांत स्तब्ध ह्वदनी!
मीच कां लावावी
सांजवात देऊळी?

## १२१. भेटी

देऊळ भंगलेले,
हळव्या चुड्यासारखे!
कातर तीरी नदीच्या,
अस्फुट हुंदके दिले कुणी?
पाहून वाट एकली,
नभात विरले कोणी!
विषण्ण वारा असा एकटा,
माडांचे डोळे स्फुंदती!
घाटावर केवळ उरल्या
भंगल्या खुणांच्या भेटी!

## १२२. अनुभव

अनुभव -
मनाचे, तनाचे!
अनुभव,
डोळ्यांचे!
दाहक!
न बोलता येणारे!
भाषा दे नवी,
तर गाईन
सूर तुझ्या
शिल्पांचे!

□ □ □

## १२३.अशोक

खिडकीसमोर
वळणदार ज्युलीफ्लोरा!
प्रणयात दंग,
वाऱ्याच्या!
छाया हळूच
कलतात मागे
सूर्याच्या खांद्यावर टेकायला!
पण,
अशोक मात्र
तपस्वी!
गतजन्मीच्या
अर्धस्मृतींत
गुंतलेला!
रात राणीची फुलं,
खांद्यावर ठिबकत असतांना
सुद्धा!

□ □ □

## १२४.वेदना

गर्द नभाला एकाकी झेलत,
उभी आहे,
आपल्या मऊ केसांत!
ही वाट दूर जाते!
ह्वपेरी वळणांच्या गोल चौकात!
अधांतरी वाऱ्यात,
तरंगत,
मग्न उभे रान!
हळूच मिटते
अश्रू भरले नेत्र!
अधू पायातली
कातर बोचली वेदना!

## १२५. तीर

सहा बाय दहा -
मापाचे यमुनेचे तीर!
बुडवत गेले
वृंदावनात,
लयबद्ध छेडत बोल!
असीमात हळूच
क्षणभर पाऊल ङ्करले!
पण नजरेने बांधत,
झेपावली मने!
स्पर्श इतके हळवे,
की सुरांनी हक्क सोडला,
यमुनातीरी रंगणाऱ्या
घन:श्यामल राधेचा!

  

## १२६. भेटी

मी अस्वस्थ!
एकाकी सुरांत गुंतलेली!
डोळे चुरचुरतात,
तमात विरलेल्या चांदण्यात!
अधू पायात
गुंततात,
त्या नजरभेटी!
खोल काळ्या
डोहात,
कायमसाठी भंगलेल्या!

## १२७.मोगरा

गुंतले मऊ
पाकळ्यांवर,
मरणगंध!
पहाटश्वासातून
टिपलेले!
आता हळू उलगडीन,
डोळे मिटल्या रानपाखरांचे!
शुभ्र काळोखात वलये,
फिरतात आसावलेली!
गंधमरणाच्या खुणांचे
भोग फुलवत,
रान धुंदावले मोगऱ्यांचे!

## १२८. विराणी

अस्फुट हिरव्या
पानांतून चढणारी गुंगी!
ओल्या पाकळ्यांत
विरघळणारी
कुणी परदेशी विराणी!
उलगडत गंधखुणा,
आंधळ्या पाकळ्या
शोधतात सतारीचे बोल,
'कुठे जाणार त्यांचे आंधळे हळवे डोळे?'
कललेले चंद्रबिंब कुजबुजते!

## १२९. मृगजळ

हळूच सरसरत जाते
मुंग्यांची लाट,
मस्तकाच्या तळाशी!
अधू डोळ्यात विस्कटतात,
दृश्यांच्या जाणिवा!
दूरवर हळूहळू
उगवणारी मृगजळं,
गिळू पहातात
कोवळ्या चंद्रकळा!
एकमेकांत मिसळणारा
विच्छिन्न प्रकाश,
चेतवत रहातो,
असहाय मस्तकातल्या
विद्वेषी मुंग्यांना!

## १३०. वेदना

रेखीव भाळावर
लिहीलेले
अदृश्य शाप,
सतत जाळत रहातात
तळहातावरच्या
रेशमी खुणा!
आयुष्य घरंगळत रहाते
थेंबाथेंबाने,
भग्न शिवालयातल्या
रिक्त गाभाऱ्यात!
शापांचे कंगोरे
उरात बोचत रहातात,
विकल वेदनेला
अंधारभयात वेढत!

▯ ▯ ▯

## १३१. रात्री

स्वरतंतूत गुंता
पांढऱ्या सळ्यांचा!
दिवसागणिक विणत जाणारा
एकरंगी गोफ!
फारकत होते
सूर नि स्वराची!
अंधारगर्तेत
बुडतात डोळे!
आंधळ्या
रात्री चाचपडत!

## १३२. केयूर

लालसर गुलाबी
नखांच्या कमानीत,
उभा मोहरलेला राजवाडा!
तारांसाठी छेडलेल्या
हळव्या बोटांतून,
उतह्रन
वाट जाते
खोल गंभीर ओंकारात!
डोळे मूक
ढाळत रहातात,
चमकणारे अश्रू!
निर्मळ खर्ज विरत रहातो,
राणीच्या केयूरात!

□ □ □

## १३३. संदेश

प्रतीक्षेच्या कुमारीभूमीत
पेरलेला,
नि:संदिग्ध पावसाळा!
बेदाग, तरल
आभाळातून येणारे,
स्फटिकांचे
झळाळते संदेश!
बागेश्रीच्या
प्रत्येक सुराला
वेढत जाणारे,
तू दिलेले
असहाय एकाकीपण!

□ □ □

## १३४.पंचम

दूरदूरच्या राखी डोंगराआडून
काळोखाची वलये झेपावू लागतात,
नगरवेशीच्या दिशेने!
एक स्तब्ध - किर्र हुरहुर,
दाटू लागते ओल्या हवेत!
पाऊस कोसळत रहातो,
जीर्ण भग्न मनोऱ्यावर!
कोणे एके काळी चमकणारे सूर,
पुनः घुमू लागतात
श्रावणाच्या ओल्या केसात!
तरीही मैफल रितीच रहाते.
कारण,
स्वरांच्या महालात
पंचम भंगलेला असतो!

## १३५. डाव

पुढे ओढणारे पाऊल मी मागे खेचले,
तेव्हा काय ठाऊक होते की,
आजचे दवबिंदू
उद्याच्या आयुष्यावर ओरखडे ओढत जातील!
निरर्थक स्वप्नं उराशी बांधून,
मी अनेक आयुष्यांत डोकावले!
पण डाव हरण्यासाठीच असतो,
हे मला दाखवलं
सरळ भांगातल्या रुपेरी चमकणाऱ्या केसानं!
तेव्हापासून हरतेच आहे सारखी,
पण पुन्हा डाव मांडायला
मनात उभारीच उरत नाहीये!

## १३६. नजर

मी पाहिली आहेत
अनेक निष्पाप फुलपाखरं,
फुलांवर मरून पडलेली!
सायंकाळी गच्च
भरून आलेल्या आभाळात,
मी मल्हार ओवला आहे!
डोळे मिटून घेतलेत,
पण तुझी विव्हल नजर
अजूनही -
तिसऱ्या जन्मातही
मी विसरू शकत नाही!

## १३७. वियोग

आता सहन होत नाही
चिरवियोगाची कल्पना!
तुझे तरी काय,
श्वास गुंतलेत संगमरवरात!
जाणवलं नाही तरी,
आज या प्रतीक्षेला
तू उद्वेगाचं गालबोट लावलंस!
नि-
दूर जातो आहेस
पुन्हा दृश्य व्हायला!

## १३८. एकटेपण

कुणीच नसते कां आपले?
थोडे हसणे, रूसणे
केवळ विरल्या लाटा ठरतात!
एकटेच येतो आपण बिचकत
अंधाऱ्या भुयारातून!
परक्या लख्ख उजेडात
जीव थरथरतो!
काळीज धडधडते!
अखेर एकटेच यायचे
सुन्न रस्त्यांवर!
एकटेच मुक्याने गाणे म्हणत पुढे जायचे!
निष्पर्ण झाडावरच्या पोरक्या सावलीसारखे!
जर आहे यायचे एकटेच,
नि संगत नाहीये परत जातांना,
तर
कशाला जगतात ही मुंग्यांसारखी
माणसे या रखरखीत वाळवंटात?

## १३९. तहान

ज्वाळांनी वेढलेल्या
कड्यावर उभी आहे. केव्हाची!
मृग बरसेल म्हणून!
वाट पहाते आहे!
'तुमबिन जाऊँ कहा!'
खोलवर कण्हते
असहाय वेदना!

## १४०. साद

दूरवर पसरलेले
अथांग एकलेपण!
झाकळलेल्या आयुष्याला
सावरत उभी आहे!
‘तुमबिन जाऊँ कहा!’
प्रतिध्वनी नुसतेच विरत जातात
त्या एकाकी वातावरणावर
धूसरतेची वलयं झेपावू लागतात!
पावलं वेगानं घसरत जातात!
ते हिरवं चित्र
वेगानं नजरेआड जातंय!
‘डेंजर’!
बेभान कलणारे डोळे
मिटू पहातात!
क्षण निघून गेलाय!
फक्त
आता बेभान कोसळणं!
दूरवरून येणारी
तुझी अस्पष्ट साद,
डोळ्यातल्या अश्रू पटलात
धूसर होऊन विरून गेलीय!

## १४१. माझ्या मनातली स्वप्नं

माझ्या मनातली स्वप्नं
नेहमीच परदेशी होऊन विरून जातात!
निदान आज तरी,
बांबूच्या बनात
खोल पुरून ठेवलेल्या
विद्रोही क्षणांचे थवे
तू जागवू नकोस!
कारण
माझे अश्राप डोळे
केव्हाच देशांतराला निघून गेले आहेत!

## १४२. सूर

अतृप्त आभाळात गोठलेल्या बगळ्यांच्या,
असहाय नजरा धुक्यात पेटत जाताहेत!
रक्तलांछित डोळ्यात पेरलेल्या
डाळिंबाच्या दाण्यांना
कोवळे सूर फुटावेत,
तसे आभाळ भरभरून आले आहे!
आक्टोपसच्या स्पर्शाने दंशलेल्या
ओल्या पहाटेला कधी भेटावं
हा प्रश्न अनुत्तरीतच राहिलाय!

## १४३. तळहातावरच्या..

तळहातावरच्या फिकट
रक्तवाहिन्यांचे जाळे!
त्यातून उमलणारे
चांद्रमुखी तळे!
चर्चच्या झांजरत्या घंटा
माळूनही रात्री बुभुक्षितच रहातात!
कधी संपवायचे हे रात्रीचे गाणे?
तुझ्यात अडकलेले हे पोरके पाखरू,
केव्हा मातीला दान करायचे
हे तूच ठरव.
कारण आभाळ उतरले आहे
क्षितीजावर!

## १४४. सांज

कधी खोल उतरू लागते,
शिरशिरणारे चांदणे
गाभुळलेल्या डोहात!
वेढले जाते नि:स्तब्ध घायाळ आकाश,
पेटलेल्या निर्भेळ ज्वालांत!
सांज एकटीच बसते,
खोल उतरत्या उन्हावर!
गात असते
धूसर छायांचे शोकगीत!

## १४५. देशांतर

रूपेरी फांद्यांवरून किरण घरंगळून जातात!
हलकेच डोकावू लागते,
सांजेची निळी छटा
माझ्या उजाड आयुष्याच्या माळावर!
रात्रीमागून रात्री,
अर्थशून्य नुसत्याच ओघळत रहातात.
काचेवरच्या पाऱ्यासारख्या!
अभोगीचे सूर,
माझ्या अर्धमिटल्या पापण्यांवर
नुसतेच फिरत रहातात!
कारण पापण्यांतून उतरून
तू केव्हाच देशांतराला गेलेला असतोस!

## १४६. अंकुर

किती दूरवरून
तरंगत येताहेत,
मंद, एकल्या वायुलहरी!
माझ्या केसांवर, ओठांवर
गालांवर,
त्यांनी वाहून आणलेल्या
तुझ्या बेभान श्वासांची
पखरण होत आहे!
माझ्या मिटल्या डोळ्यांवर
झुळुक होऊन तुझे शब्द कुजबुजताहेत!
अन्
कुमारीभूमीवर
कोवळे कोवळे
हिरवे अंकुर फुटताहेत!

## १४७. चूक

उशीवर डोकं टेकून
गेल्या दिवसांची
उजळणी करत होते
मध्येच केव्हातरी कळले
की आपण
संगतीच चुकीची लावली आहे.

## १४८. धारा

पावसाच्या धारा
घेरत येतात मला!
नुसतेच अर्थहीन
डोलणारे वेडे माड!
किती युगांपासून
कोरडे जगताहेत!
हे तुला ठाऊक आहे?
त्या धारांचा वेढा
मला साहत नाही!
रेषांचे जाळे
तुझ्या डोळ्यांत
कां शिरत नाही?

## १४९. दान

कितीतरी अर्थहीन रात्री
पापण्यांवरून घरंगळत जाताहेत!
कोणत्या फितूर क्षणाला
वाळवंटातले टिपूर चांदणे
मावळून डोळ्यात शिरले?
त्याच्या खुणा किती धूसर झाल्या आहेत!
आत्ममग्न दिशांच्या कोन्याकोन्यातून
पेटलेल्या ज्वालांचे अंगार,
तू केसात माळू नकोस!
माझ्या पापण्यांनी,
श्वासांना
केव्हाच दान केले आहे.

## १५०. एकांत

माझ्या शरीराच्या कणाकणात,
झिरपत खोलवर उतरणारा,
अभोगी एकांत!
किती दूरस्थ आहेत
वारा पेटवणारे श्वास!
अंगावर कोसळणारा विच्छिन्न काळोख!
माझ्या अर्धस्फुट डोळ्यांना परदेशी आहे!
काळोख चिरून आत डोकावले,
तेव्हा तुझे डोळे तिथे एकटेच
मृत होऊन पडले होते!
त्यांना कुरवाळत राहिले!

## १५१. प्रवास

दूरवर पसरलेला
निळसर काळोख थबकला आहे!
भयाण एकांताच्या भिंतीवर आदळून
श्वास पांगळे होत आहेत!
निर्मोही शरीराचे निर्वात प्रदेश
किती स्तब्ध आहेत!
डोळ्यांपुढं दूरवर पसरलेले,
काळेशार प्रवाह तोडून
आरपार जाणारे नावाडी,
आता दमले आहेत!
प्रवाहात तरंगणारी
हिरवी, अजस्त्र फुलं,
आसुरी आनंदानं डोलताहेत!
या एकांताचे तीर,
डोळ्यांचा दाह करताहेत.!

प्रवाहात एकेकटी
तरंगणारी पानं किती कोवळी आहेत!
शहारलेल्या लाटेबरोबर
माझे असंख्य डोळे विखुरले गेले!
अंतहीन प्रवास नेहमीच भोवळ आणणारा असतो!
जेव्हा उन्हाळ्यात,
या सावलीच्या डवरलेल्या
वेलाखाली,
शांत गारठा सोसत
तू पहुडला असशील,
तेव्हा माझे डोळे
कुणाची चिता दग्ध करत असतील?

## १५२. वाटा

इथून दोन वाटा फुटतात!
एका वाटेला झिलई स्वप्नांची आहे!
पण वाटेवर नागफणीची
लुसलुशीत लाल बोंड वाऱ्यानं डुलताहेत!
दुसऱ्या बाजूनं आकाशाचा काठ
डोळ्यातच येत नाहीये!
इथून ती कमळं
अशी अंधुक हा दिसताहेत?
कदाचित माझ्या डोळ्यांतलं पाणी,
त्यांच्या पाकळ्यांना दाह करत असेल!
आता दोन्ही वाटा पुसट होत आहेत!
माझे श्वास अंधूक होताहेत
पाय खचायला लागलेत!

## १५३. डोळे

काल अचानक,
सांजेत बुडालेली त्याची लालभडक पावलं,
माझ्या डोळ्यांपुढं येऊन थबकली!
'तुझी संध्याकाळ कोठे आहे?'
माझ्या बोटातले
घायाळ स्वप्नपक्षी,
ऐन शारदीय दुपारी
झाडावरून देशांतराला निघून गेले!
झाडात एकलेच रुतणारे
काळजाचे शोकमग्न बंध,
माझ्याच अधुऱ्या शब्दांनी,
मी सायंकाळच्या
विद्रोहाने पेटलेल्या मोहाच्या फुलांत
भिरकावून दिले!
त्याची संध्याकाळ खूप दूर
उभी राहून पहात होती!
त्या नवथर रात्रीच्या प्रीतीगीताचे भग्न महाल!
(हळूहळू माझे डोळे)
विलग होत गेले!

एका वाऱ्याच्या शीळेने,
एकमेकांना बिलगलेले झाड नि
आभाळ दूर सरकत गेले!
आता आभाळ दुसऱ्या देशात जाईल!
तिथे उतरत्या सांजेला नदीच्या पात्रात,
असेच डोळे कुणी त्याला दान करेल!
पण त्याच्या डोळ्यातली ती
जळती अग्निखूण मात्र,
प्रत्येक शारदीय रात्री
तरारून सजीव होऊन उठेल!
त्या रात्रीत विसरलेल्या
संध्याकाळचे फुटलेले कंगोरे,
मिसळून जातील!
तेव्हाच संध्याकाळी मोरपिसारा उभारून,
माझे दूर गेलेले
हरवलेले डोळे मला परत मिळतील!

## १५४. गारठा

रोजच सकाळी
या झाडावर पक्षी येऊन बसतात!
अधुऱ्या, बोचऱ्या
सुरांनी विस्कटत रहातात
पापण्यात जमू पहाणारे विषण्ण, रंग!
कित्येक आसावलेले ऋतू निथळून गेले!
पण त्या
पापण्यांत थिजून राहिलेला
बधिर गारठा!
अजूनही चाचपडतेय
त्या बधिर उजेडात
माझीच जळणारी बोटं पहात!

## १५५. पाऊलखुणा

हात पाय मोडलेल्या
वांझोट्या दुपारींची,
अधुरी प्रतिबिंबे
काचेत!
केव्हातरी ऐकलेल्या
दग्ध पियानोच्या
थडग्यावर,
निशिगंधाची आरास!
भ्रष्ट उन्हाळा
डोळ्यात रूतून बसतो!
पाऊसपक्षी देशांतराला जातील,
तेव्हा पाऊलखुणा
डोळ्यात मिटवायला
तू विसरू नकोस!

## १५६. दूर-दूर

दूर समुद्र! तडफडणारा!
अधांतरी फिरणारे
हजारो डोळे
झाडाझाडाला लटकून जळताहेत!
इथले शुष्क, रेशमी आभाळ
नेहमीच अंगावर उतरते माझ्या!
पण इथं,
रंगांची पिसं
लाटांगत गळून किनाऱ्यावर रुजताहेत!
तर विफल अंधारवेदनेचे गीत
आभाळाच्या कानात कसे सांगू?

## **१५७. चाफ्याचे फूल!**

गालांना झोंबणारा
प्रारब्धवादी हिवाळा!
अंधारात उखडलेले धुमसणारे डोळे,
किरवाणीत बुडताहेत!
पाऊसपाखरे, विव्हल वेणा देत
आंधळी झाली आहेत!
अधू डोळ्यांवर हळूच पसरणारी
किरवाणीची गडद छाया!
दूर लाटात
चाफ्याचे फूल!
अधांतरी!
एकटेच, दूर दूर!
माझ्या ओठात समुद्र साकळला आहे!

## १५८. केवडा

गॅलरीत शून्य अस्तित्व!
सर्वांगावर कान उमललेत!
तरीही सतत झोंबणारा,
तो चिरपरिचित
बर्फाळ मरणगंध!
कानात केवडा उतरतो आहे!
चिद्‌बंध सोनेरी करायला!

## १५९. डोळे

तुझ्या खिडकीतून दिसणाऱ्या
किनाऱ्यावर चालतांना,
'ती कबरी बुटकी बदकं थबकून मागे का
पहातात?' तू म्हणालास!
कित्येक पावसाळ्यांपासून
डोळ्यांवर बुरशी साचत चाललीय!
हिरवट पिवळ्या रंगाची
फुलं काढावीत तर,
काचेत गोठलेल्या अळ्याच
कानाशी गुणगुणू लागतात!
समुद्रपक्षी रात्री जेव्हा
माझ्या कुशीत येतात,
तेव्हा दूर दूर दीपस्तंभावर
लाल दिवा चमकू लागतो!

माझे किनारे निसरडे आहेत!
आपली पावलं आपणच जपून
काचेच्या तळघरात बंदिस्त ठेवावीत!
नाही तर बर्फाळ वाऱ्याने
तुझ्या बुबुळांना तडे जातील''
मी म्हणाले!
''प्रत्येक पावलावर आधीच
रेखून ठेवलेली लालसर स्वस्तिकं असतात!
फक्त ती पहायला हवी असतील तर
तू केसात मोगरा माळू नकोस''!
हसून तो म्हणाला!

## १६०. स्पर्श

पौर्णिमेला पळसाच्या फुलांच्या
हळव्या केशरी गाभ्यात दडून बसलेल्या अंधारात,
डोळ्यांना हजारो
स्पर्श फुटतात!
पावलांतून शिरणारा
सर्वगामी गारठा
केव्हाचा स्तब्ध उभा आहे!
रात्र जेव्हा सरेल
तेव्हा तू हळूच ये!
चांदण्यांच्या आरशात
मला स्पर्शून घे!

## १६१. डिसेक्शन

टण् टण् टण् टण्
सीझर्स चा खणखणाट!
डिसेक्शन चालू आहे!
'टेक केअर व्हाइल
डिसेक्टींग आय-बॉल प्रॉपर'!
चर्चबेल वाचलास का तू?
उद्या मी गावाला जाणार आहे
तुझे डोळे वेड लावतात पहा मला!
इतना कजरा मत लगाव गोरी
के हमारे दिल की धडकन
काबू मे न रहे!
''आँखों मे क्याजी
रूपहेला बादल''!
डिसेक्शन चालू आहे!
टण् टण् टण् टण् !
डिसेक्शन चालू आहे!

## १६२. तूच आणि तूच

तू इतका जवळ येऊ नकोस,
कि तुझ्या श्वासांच्या धगीत
माझे डोळे होरपळून जातील!
बाभळीचा काटा जरी असला
तरी त्याची दिशा त्याला असतेच!
तू असं बोलू नकोस,
कि तुझ्या शब्दांनी
मी जमवलेल्या मोर पिसांचे
क्षणात बर्फ होऊन जावे!
तू असा बघू नकोस
कि त्याच क्षणी माझ्या आत्म्याने
देहाला सोडून द्यावे!

## १६३. अंधार

आभाळात पसरणारा असहाय काळोख!
प्रत्येकाच्या मनात लपलेला अघोरी काळोख!
अंधाराला स्पर्श नसतो!
चेतना नसते!
किनाऱ्यावर असलेल्या
काळसर समुद्रपक्ष्यांच्या,
डोळ्यात भिजलेला अंधार!
माझ्या पांगळ्या पायातून
झिरपणारा अंधार!
अंधाराला साथी नसतो!
प्रत्येक वादळ्या रात्री
वाजणाऱ्या चर्चवरील मनोऱ्याचा घंटा
अंधार लाटा फेकत रहाते!
शेकोटीशी पाय दुमडून तू बसलेली असतेस!
तुला चेहरा नसतोच!
तिथे दिसते स्फिंक्सचा मेणपुतळा!
कारण तुझ्या नसानसातुन वाहणारा अंधार
केव्हाच गोठून गेलेला असतो!